# एक बंदिवान

...येथे पुन्हा, प्रभु येशूच्या नावाने, आणि तु यापूर्वी, केलेल्या महान आणि पराक्रमी कृत्याबद्दल ऐकण्यासाठी. आणि आता आम्ही अपेक्षेने उभे आहोत, आमचा विश्वास वाढव आणि आम्हाला अभिषेक कर, हा विश्वास ठेवण्यासाठी की आज रात्री जे मागितले आहे ते दिले जाईल. तु त्यांच्यातील प्रत्येकजणाला ओळखतोस, ते सर्व जे त्यांनी मागितले आहे. आणि प्रभु, विशेषतः, आम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना करतो, जे मृत्यूच्या अगदी जवळ आहेत. त्यांच्या आत्म्याला शांती दे जर ती तेथे नसेल तर. त्यांच्या देहाला आरोग्य दे. प्रभु, ते प्रदान कर.

2 आमचे एकत्र मिळणे आशीर्वादित कर. आम्ही—आम्ही प्रार्थना करतो, प्रभु, या बुधवारी रात्रीच्या प्रार्थना सभेत, की, जसे आम्ही एकत्र आलो आहोत, हे जाणून की जेथे दोन किंवा अधिक एकत्र जमले आहेत, तेथे तु आमच्यासोबत असशील. आणि प्रभु, आम्ही तुझ्याकडे मागतो, की आज रात्री आम्हाला तुझे वचन दे. प्रभु, आमच्याशी बोल, आणि अद्भुतरीतीने, आमचे हृदय उत्साहपूर्ण कर, की पुढे येणाऱ्या महान समयासाठी स्वतःला शिस्त कशी लावावी हे आम्हाला कळेल, जसे आपण विश्वास ठेवतो की आपण प्रभूच्या आगमनाच्या जवळ आहोत.

3 आम्ही तुझे आभार मानतो कारण लोक आता विश्वास प्रिय मानू लागले आहेत, आणि विश्वासाचा अर्थ काय हे जाणून घेत आहेत. आणि हे जाणून, पुढे होणाऱ्या सभांसाठी तुझे आभार मानतो, विश्वास ठेवतो की तु काही तरी करणार आहेस. प्रभु, आम्ही पूर्वीच्या दिवसांप्रमाणे, आशेने वाट पाहत आहोत, विश्वास ठेवतो की तो समय जवळ आहे जेव्हा तु स्वर्गाच्या खिडक्या उघडणार आहेस आणि ह्या अंतिम दिवसात त्या अभिवचनांचा वर्षाव करणार आहेस ज्यांचे देवाने आश्वासन दिले आहे.

4 प्रभु, आता आम्ही तुजकडे मागतो की—की सर्वां बरोबर असो, सर्व राष्ट्रांसह, आज आपण आजूबाजूला, सर्वत्र ऐकले आहे, की त्यांना गरज आहे. प्रभू, त्यांच्या मागण्या पूर्ण कर. आणि आम्ही प्रार्थना करतो की हा—हा देवाचा महान हात या महान गोष्टीच्या शोधात असलेल्या लोकांमध्ये जगभरात फिरत आहे.

5 आमच्या पापाची आम्हाला क्षमा कर. प्रभु, तुझ्या आत्म्याने आणि तुझ्या वचनाने आम्हांला शिस्त लाव, जेणेकरून आम्ही स्वतःला, आज्ञाधारक सेवकांच्या अधीन करू शकू, आज्ञाधारक सेवक देवाच्या इच्छेच्या अधीन. आपण आठवूया, आणि आपल्या अंतःकरण विचार करण्याचा प्रयत्न करू या, की प्राचीन ख्रिस्ती लोकांनी काय केले. आपण कोणत्या प्रकारच्या लोकांना भेटू जेव्हा आपण त्या लोकांना भेटू जे तुमच्याशी वैयक्तिकरित्या संपर्कात होते. त्यांचे चेहरे कसे विश्वासाने आणि आनंदाने उजळतील. कसे त्यांचे जीवन देवाचे जिवंत वचन झाले असेल, अगदी "लिखित पत्रे सर्व माणसांनी वाचलेले," जेव्हा ते लोकांमध्ये चालत आणि लोकांमध्ये फिरत. देवा, पुन्हा एकदा ते प्रदान कर.

6 आमचे जीवन तुझ्यासाठी असेच समर्पित होऊ दे, की प्रभु, पवित्र आत्मा स्वतः आपल्याद्वारे जगेल, आणि आपल्याद्वारे बोलेल. रस्त्यावरून चालताना आणि जगाशी हातमिळवणी करताना, आम्ही आपल्या मनात, आठवू, आम्ही त्यांच्यासारखे नसावे. आणि प्रभु, आम्ही बाजूला होतो आणि त्यांना पृथ्वीवर त्यांच्या योग्य स्थानावर, जागा देतो. आम्ही दुसऱ्या जगाचे प्रतिनिधी आहोत हे जाणून, आम्ही मागची जागा घेऊ.

प्रभु, आमच्याकडे एक राज्य आहे जे सत्तेत येणार आहे. आणि आपला महान राजा लवकरच येईल आणि त्याच्या अधिकारात असलेली सर्व राज्ये ताब्यात घेईल. आणि तो सत्ता करील व राज्य करील; त्याच्याबरोबर पृथ्वीवर, हजार वर्षे, आणि सदासर्वकाळ त्याच्याबरोबर राहू.

7 हे लक्षात घेऊन, प्रभु, आता आम्ही आमच्या प्रार्थनेच्या उत्तराची वाट पाहत आहोत. आम्ही आमच्या कबुलीजबाबाकडे पाहतो. जर आम्ही काही केले असेल, काहीही बोललो असेल किंवा काही विचार केला असेल, जे तुझ्या महान इच्छेच्या विरुद्ध असेल, येशू ख्रिस्ताचे रक्त आम्हाला शुद्ध करू दे.

8 प्रभु, आमचे नेतृत्व कर, आज रात्री त्या बहिणीने म्हटल्याप्रमाणे, ती आणि तिच्या पतीचे शिकागोच्या मार्गावर. प्रभु देवा, त्यांना अशा ठिकाणी ने, जेथे तु त्यांचा उपयोग करू शकशील, जे आपल्या प्रभु येशूला ओळखत नाहीत, त्यांच्यासाठी ते अंधारात वावरणाऱ्यासाठी प्रकाशाचे किरण व्हावेत. आता आम्ही ही सभा तुला समर्पित करतो, आणि तुझ्या सुधारणेचे वचन ऐकत आहोत, या महान समयाची तयारी कशी करावी हे आम्हाला कळेल, येशूच्या नावाने आम्ही ते मागतो. आमेन.

[टेपवरील रिकामी जागा. भाऊ नेव्हिल टिप्पण्या करतात—संपा.]

प्रभु तुम्हाला आशीर्वाद देवो. धन्यवाद, भावा.

9 मला हे थोडेसे अनपेक्षित होते. मी, येथे घरी असल्याने, मला असे वाटले की मला खरोखर कुठेही निकडीच्या समयासाठी, जावे लागणार नाही, मला खूप वाईट वाटले, मी घरी बसून राहिलो आणि प्रार्थना सभेला आलो नाही. आणि मी एक प्रकारे, अनपेक्षितपणे, स्वतःला, अगदी माझ्या कुटुंबातही आलो. मी आत्ताच आत शिरलो, आणि लगेच उतरलो. आणि म्हणून मी म्हणालो, "मी प्रार्थना सभेला जात आहे." आणि तिला येण्यास तयार व्हायलाही वेळ मिळाला नाही, कारण मी येत आहे हे तिला माहीत नव्हतं.

10 त्यामुळे तेथे बहिणीची साक्ष ऐकून मला आनंद झाला, भाऊ, दक्षिण कॅरोलिना किंवा नॉर्थ कॅरोलिना येथे कुठेतरी त्या प्रकाशा बद्दल. ग्रीनविले, ते होते का? [एक बहीण म्हणते, "नाही. दक्षिणी पाइन्स."—संपा.] दक्षिणी पाइन्स. होय.

11 भाऊ ली वायले आजच येथे आले होते. आज येथे बाप्तिस्मा सभेत, आज, मी त्याला बाप्तिस्मा दिला. बंधू ली वायले, तुम्हाला माहीत आहे, तेथील सेवकांपैकी एक, बंधू पार्कर थॉमस. तेथे होता…

12 मला तो—तो समय आठवतो, एका बहीणीवर छाया आली. हे एक उत्तम पुष्टीकरण होते, बहीण, कशाचे…पवित्र आत्मा कधी कधी आपल्याला पुढे जाऊ देतो आणि आपल्या विश्वासाची परीक्षा करतो, ते पाहण्यासाठी…आणि इतरांच्या विश्वासाची परीक्षा करतो. जेव्हा तुम्ही एखाद्या गोष्टीकडे थेट पाहता, आणि काहीतरी पाहता, आणि ते म्हणता; इतर पाहतात आणि ते पाहत नाहीत, ते म्हणतात की ते तेथे नाही. पहा? पण ते तेथेच आहे.

13 आता, पौलावर प्रकाश लटकत असल्याचे तेथे कोणीही पाहू शकत नव्हते, परंतु तो तेथे होता. त्या कबुतराला आकाशांतून, त्या प्रकाशात, त्या स्वरूपात, खाली येताना, आणि येशूवर लटकताना, कोणीही पाहिले नाही, पण स्वतः योहानाने. पण तो तेथेच होता. समजले?

14 आणि म्हणून, नंतर, जेव्हा मी लोकांना हा प्रकाश अग्नीच्या स्तंभासारखा असल्याबद्दल सांगत होतो, कोणीही त्यावर विश्वास ठेवू इच्छित नव्हते. पण आता कॅमेऱ्याच्या यांत्रिक डोळ्याने ते ओळखले.

आता पहा की तो दुष्ट आत्मा अंधकारमय आहे.

15 तो अगदी आपल्या जीवनासारखा आहे, आपण छायारूप आहोत. आणि आपण आहोत, जर आपण प्रकाश आहोत, आपण आहोत, जर आपले जीवन ह्या दिवसाच्या प्रकाशाशी समरूप होत असेल, तर आपण प्रकाशात चालत आहोत.

16 हे अगदी तसेच आहे जसे तुम्ही बाहेर बघता आणि म्हणता, दिवसा, "मी सूर्य पाहतो." तुम्ही—तुम्ही सूर्याची सावली पाहता. ते सूर्याचे प्रतिबिंब आहे. तो स्वतः, सूर्य नाही, परंतु हे सिद्ध करते की तेथे सूर्य आहे. हे सिद्ध करते तेथे सूर्य आहे.

17 आणि आता जेव्हा मी पाहतो, जसे तुम्ही तेथे बाहेर बसता, पंखे वापरत आहात, बोलत आहात, याचा अर्थ तुम्ही जीवंत आहात, पण ती फक्त जीवनाची छाया आहे.

18 कारण, कोणत्याही गोष्टीला छाया बनवण्यासाठी, अंधार असावा लागतो. समजले? कारण, छाया बनवण्यासाठी, छायेकडे इतका अंधार आणि इतका प्रकाश असावा लागतो. आणि तो पूर्णपणे अंधार असू शकत नाही, आणि तो पूर्णपणे प्रकाश असू शकत नाही. जर तो अंधार असेल, तर तो खरा अंधार आहे. जर तो प्रकाश आहे, तर तेथे सावली नाही, सावली बनवण्यासाठी काहीही नाही. परंतु जर ते अंधार आणि प्रकाश मिसळले, तर ते सावली बनवते.

19 त्यामुळे आपण खरोखर प्रकाशाच्या सावल्या आहोत. आता तुम्ही कुठूनतरी जीवन प्रतिबिंबित करत आहात. जर तुम्ही आहात, आणि ख्रिस्ती, ही एक सावली आहे, तर हे केवळ सिद्ध करते की तेथे एक जीवन आहे जेथे तुम्ही मरू शकत नाही, कारण या जीवनात मृत्यु आहे. समजले? पण ती एक सावली आहे, कारण तुम्ही जीवंत आहात, पाहण्याची, विचार करण्याची, हालचाल करण्याची, आणि बोलण्याची क्षमता असलेला प्राणी, आणि शरीराची पाच इंद्रिये. पण तरीही तुम्हाला माहिती आहे, ते मरणोन्मुख आहेत. आणि तेथे खूप त्रास आहे. तुम्हाला माहीत आहे, ते फक्त असू शकते…हे एक प्रतिबिंब आहे, पहा, तेथे जीवन आणि मृत्यु एकत्र मिसळलेले आहेत.

20 शरीराला मरावे लागते. परंतु जर तुम्ही तुमच्या नश्वर जीवनाद्वारे, स्वर्गाचा प्रकाश प्रतिबिंबित करत असाल, तर तुम्ही शाश्वत जीवन, देवाला प्रतिबिंबित करत आहात. मग जेव्हा तुम्ही मृत्यु पावता, तेव्हा तुम्ही त्या प्रकाशाकडे जाण्यापेक्षा अधिक काही करू शकत नाही, कारण तेच तुम्ही प्रतिबिंबित केले आहे.

21 जर तुम्ही काळोख्या जगाचे असाल, तर तुम्ही ते प्रतिबिंबित कराल आणि तुम्ही करू शकता, अंधाराकडे जाण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. पहा? त्यामुळे आपण एका प्रतिबिंबामध्ये आहोत. म्हणून, आपण पाहतो की जितक्या निश्चितपणे पवित्र आत्मा प्रकाश आणि जीवन प्रतिबिंबित करतो, त्याचप्रमाणे मृत्यु अंध:कार प्रतिबिंबित करतो.

22 आणि येथे ते दोन्ही आहेत. उद्या–…ह्या आठवड्याच्या शेवटी, कदाचित रविवारी पर्यंत, आपल्याला हे लहान छायाचित्र मोठ्या आकाराचे करून मिळणार आहे, जेणेकरून ते फळ्यावर लावता येईल.

23 जेथे, तेथे फळ्यावर *तुमचा* फोटो टांगलेला असतो. मला माहीत नाही तुम्ही त्याकडे लक्ष दिले, किंवा नाही. आणि मग…

आणि सुमारे एक आठवड्यापूर्वी, जमैकामध्ये—मध्ये, जेथे मी सेवकाई करत होतो…आम्ही जगभरात टेप पाठवतो. आणि *द सेव्हन सील्स* परत आले आहेत…फार काळापूर्वी जमैका बेटांवर, जमैकाच्या अंतर्भागात. आणि ते ब्लू माऊंटनच्या मागे, तेथे ते फार प्राचीन काळापासून आहेत. आणि मूळ रहिवासी, कधीकधी, त्यांच्याकडे एक—एक

टेप रेकॉर्डर आहे आम्ही त्यांच्यासाठी आणलेला आहे, तो तुम्हाला करावा लागेल—लागेल, जुन्या व्हिक्ट्रोलाप्रमाणे, तो हँडल फिरवून चालवावा लागतो, आणि नंतर तसाच चालू करावा—करावा लागतो. मग, दर काही मिनिटांनी, कोणालातरी तो हँडल फिरवून चालवावा लागतो.

24 ह्या समुहाकडे एक—एक लहानशी...एक बॅटरी, सहा–व्होल्टची बॅटरी, किंवा दुसरी कोणती, जी टेप रेकॉर्डर चालवते. आणि ते—ते सर्व एकत्र बसले होते, आज रात्री येथे काय आहे त्यासाठी, ते *शिक्के* ऐकत होते, माझा विश्वास आहे की ते होते. आणि मी बोलत असताना, त्यांच्या लक्षात आले, खोलीत येताना, तोच अग्निस्तंभ आला, तेथे आला जेथे हा टेपरेकॉर्डर होता आणि त्याच्यावर स्थिर झाला. आणि त्यांनी जाऊन कॅमेरा घेतला आणि त्याचा फोटो घेतला. आणि अगदी तोच तो, तेथे तो आहे, त्याच्यावर लटकत आहे. आता आम्ही तो मोठा करून घेत आहोत, जेणेकरून आम्ही तो—तो फळ्यावर लावू शकतो, की आपण तो पाहू शकता.

25 देवाच्या कृपेबद्दल आम्ही खूप कृतज्ञ आहोत जिने आम्हाला...या दिवसात त्याच्या उपस्थितीत आणले आहे. आता आपण अनेक गोष्टींसाठी कृतज्ञ आहोत.

26 आता मला वाटते की मी येथे पाहीन आणि पाहीन जर मला काही, काही टिप्पण्या किंवा काही सापडू शकते का, काहीतरी दुसरे ज्यावर मी बोलावे. किंवा, आमच्यासाठी एक—एक प्रकारची आणा...माझ्याकडे काही मजकूर लिहिलेला आहे, तरीही, येथे परत एका पुस्तकात. जर मी एक शोधू शकलो तर, आपण प्रार्थना करत असताना, कदाचित प्रभु मला काहीतरी सांगण्यासाठी काहीतरी देईल.

आता, आम्ही रविवारच्या प्रतिक्षेत आहोत.

27 मी संदेशांमध्ये बोलत असतो. आणि, रविवारी, तुम्हाला खूप वेळ येथे थांबवून ठेवले, "तू माझ्याकडे का ओरडतोस? लोकांशी बोल आणि पुढे जा."

28 आता, रविवारी आरोग्य सभा आहे जेथे आजारी व्यक्तीसाठी प्रार्थना केली जाते. आता, तुम्ही आजारी लोकांकडे जा, आणि तेथे काहीतरी कारण असले पाहिजे की जर आजारी, जेव्हा आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करतो, ते बरे होत नाहीत. आणि जर प्रभूची इच्छा असेल तर, मी, रविवारी सकाळी, ही फक्त एक लहानसे प्रवचन घेऊ इच्छितो. म्हणून, मी आरोग्य सभा घेणार आहे, आणि सर्व लोकांसाठी प्रार्थना करणार आहे. आणि सुमारे आठ वाजता, बिली पॉल किंवा त्यांच्यापैकी काही येथे रविवारी सकाळी असतील, जेव्हा चर्च उघडेल, लोकांना पत्रक देण्यासाठी जेव्हा ते दाराशी येतात, किंवा जेव्हा ते आत येतात.

29 आणि आता, मग, मला प्रयत्न करायचा आहे, माझा विश्वास आहे की प्रभुने मला थोडीशी अंतर्दृष्टी दिली आहे ह्या कारणांवर की तेथे काही लोक का बरे होत नाहीत. आणि मला—मला विश्वास आहे की ही समजण्याची कमतरता आहे. आणि माझा—माझा विश्वास आहे, कदाचित, रविवारी सकाळी, प्रभूची इच्छा असेल, तर आपण यावर बोलू.

30 आता, बुधवारी रात्रीची प्रार्थना सभा ही एक छोटीशी सभा आहे जेथे आपण एकत्र जमतो आणि प्रार्थना करतो, जसे आपल्याकडे असते, आणि एकत्र भेटतो.

31 कधीकधी, मला—मला वाटते या दिवसात मला सापडलेल्या मुख्य गोष्टींपैकी एक ही आहे, आपण ज्या गोष्टींवर विश्वास ठेवतो त्यात प्रामाणिकपणाचा अभाव आहे. समजले? समजले? जर देवाने, जॉन वेस्लीच्या काळात, आज जे केले आहे ते त्या दिवशी केले असते, तर त्याने काय केले असते; मार्टिन ल्यूथरच्या काळात, किंवा

आणखी–काय? आपण त्याला काय करताना पाहतो, हे दोन्हीही चर्चद्वारे, आत्म्याद्वारे सिद्ध केले आहे, आणि विज्ञानाद्वारे, आणि प्रत्येक हालचाली, त्याचे—त्याचे—त्याचे मिश्रण ओळखले पाहिजे. आणि देवाचे वचन येथे ते घोषित करत आहे आणि ते पूर्ण होण्यापूर्वी ते सांगत आहे. आणि मग पुढे जात, आणि भविष्यवाणी करत, आणि त्याने जे सांगितले आहे तेच दाखवत आहे, त्याने जे सांगितले, ते अगदी अचूकपणे पूर्ण होईल. आणि तरीही आपण आश्चर्यचकित झाल्यासारखे, सुस्तपणे बसतो. "बरं, आश्चर्य करीत की ते माझ्यासाठी असू शकते का? आश्चर्य करीत जर तो फक्त ह्या—ह्या संपूर्ण, चर्चकरिता असू शकतो? किंवा—किंवा, मी यात खरोखर सामील आहे का याबद्दल आश्चर्य वाटते?" मला वाटतं, रविवारी सकाळी, मी अशा काही तत्त्वांवर बोलण्याचा प्रयत्न करेन ज्यामुळे आपल्याला थोडेसे ज्ञान मिळेल.

32 आता, आज रात्री, मला काहीतरी सापडले आहे, मी खाली येण्यापूर्वी, फक्त इकडे वळा. मला वाटते, "काय होईल जर बंधू नेव्हिल, जर मी तेथे उतरलो, ते म्हणतील, 'उठ आणि बोल,' आणि केवळ बसून राहीन?" समजले? मला वाटले, "मी एक दोन शास्त्रवचने लिहून ठेवणे चांगले आहे." कारण, मला माहित आहे, तो, तो इतका सुंदर भाऊ आहे, आणि आपण—आपण त्याचे कौतुक करतो.

33 आपण वचनावर प्रार्थना करण्यापूर्वी, मी एका—एका भावाची ओळख देऊ इच्छितो. मी यावेळी त्याचे नाव देखील पुकारू शकत नाही, त्यापैकी दोन. ते येथे आहेत, माझे मित्र आहेत. ते...ते कार्यक्षेत्रातील, बाहेर जाणारे, सेवक आणि सुवर्तिक आहेत. त्यांनी टेपद्वारे हे संदेश ऐकले. आणि दोन तरुण व्यक्ति, ते वेगवेगळ्या सांप्रदायिक चर्चमधून आहेत. आणि तो मुलगा इतका, त्यांपैकी एकाला इतके स्वारस्य आहे, नुकताच, तो टक्सन येथे, विमानाने आला, सभा संपताना. मला वाटते की मी बिझनेस मेन्स ब्रेकफास्टमध्ये होतो. आणि हा तरुण सहकारी, उत्तम तरुण सहकारी, खाली आला. आणि तो आहे...

34 ते कॅन्ससचे आहेत. आणि ते तेथून माझ्यासाठी आले की मी त्यांचे लग्न लावावे. मला त्याचे कौतुक वाटते. जे लोक तुमच्या प्रार्थनेवर विश्वास ठेवतात, पुरेसा, विश्वास ठेवतात की देव ऐकेल आणि उत्तर देईल असा विचार करणे; तरुण लोक जीवनात, अशाप्रकारे सुरुवात करतात. आणि काल, जेव्हा ते माझ्याकडे लग्न लावण्यासाठी येथे आले, इंडियाना राज्याच्या कायद्याची काय आवश्यकता आहे हे माहीत करून घेण्यासाठी, की त्यांच्या रक्ताच्या चाचण्या सह, लग्न होण्याआधी, तीन दिवस राज्यात थांबावे. त्यामुळे, शुक्रवारी सकाळ पर्यंत त्यांचे लग्न होऊ शकत नाही.

35 आणि शेवटी मी आमच्या भावाला सांगेन, की तो उभा राहिल आणि त्याच्याविषयी आपल्याला सांगेल, आणि तेथली त्याची प्रिय लाडकी वधू, आणि पुढचा भाऊ.

36 [भाऊ म्हणतो, "धन्यवाद, भाऊ ब्रॅन्हम. येथे येण्याचा बहुमान मिळाला. आणि मी भाऊ रॉजर ओनील आहे, कॅन्ससमध्ये राहतो, एक सुवर्तिक म्हणून, कार्यक्षेत्रात प्रवास करीत असतो, सांगत असतो, 'येशूवर विश्वास ठेवणाऱ्यांना, येशू वाचवतो, बरे करतो...?...' मी नेहमी पॅकिंग करतो...?...ही माझी मंगेतर आहे, पॅट्रिशिया ब्राउन. आम्ही शुक्रवारी, विवाहबद्ध होणार आहोत. हे माझे सह–सुवार्तिक आणि सहकारी, बंधू रॉनी हंट, येथे मागे आहेत. आणि ही त्याची मंगेतर कॅरोल आहे...?...आणि आज रात्री येथे आल्याचा आम्हाला आनंद आहे."—संपा.]

37 खूप खूप, धन्यवाद. या तरुण राजदूतांना निश्चितच शुभेच्छा देतो, प्रभु येशूच्या कार्यासाठी, देवाचे आशीर्वाद, की त्यांना ह्या मार्गात गती मिळावी. आणि जेव्हा मी आश्चर्यचकित होतो, प्रभूच्या येण्याची वाट पाहतो, आणि तरुण पुरुष आणि तरुणींना

अंतःकरणात उद्देशासह पाहतो, ख्रिस्ताची सेवा करण्यासाठी, ते मला रोमांचित करते, पहा, त्यांना अशा प्रकारे उभे राहिलेले पहाताना. माझ्या भावा, बहिणी, प्रभु तुम्हाला, खूप–खूप आशीर्वाद देवो.

38 आता आपण एका छोट्या पुस्तकाकडे वळू या ज्याबद्दल मी माझ्या आयुष्यात, कधीही बोललो नाही. आणि ते एक खूप आहे...फक्त एक अध्याय, फिलेमोनाचे पुस्तक.आणि ते एक...

39 मी थोडासा आयरिश आहे, आणि मी—आणि माझ्या खालच्या दाताभोवती तार आहे, ह्यासाठी की त्या दोघांना जागी ठेवण्यात यावे. मी, मी, कधीकधी मी ही नावे बरोबर उच्चारत नाही, जेव्हा मला माहित आहे की ते काय आहेत. आणि शिक्षणाच्या अभावामुळे, काहीवेळा मी त्यांचा योग्य उच्चार करू शकत नाही. तर, "फिलेमोन," कोणीतरी तेथे मागे म्हटले, जे मला वाटते की त्याचा उच्चार खरोखरच योग्य आहे.

40 आता, पहिले वचन, मला त्यातून फक्त एक किंवा दोन शब्द घ्यायचे आहेत.

*पॉल, येशू ख्रिस्ताचा कैदी*,...

41 आणि हेच मला आज रात्री, एक मजकूर म्हणून, वापरायचे आहे, परमेश्वराची इच्छा असेल तर, ते आहे: *एक बंदिवान*.

42 आता, तुम्ही पौलाला स्वतःला कैदी समजत असल्याची कल्पना क्वचितच करू शकता. जन्मापासून मुक्त मनुष्य, पवित्र आत्म्याने भरलेला, परंतु तरीही तो स्वत: ला "एक कैदी." म्हणतो.

43 आणि आता आम्हाला कळते, जेव्हा तो करिंथकरांना संबोधून बोलतो, "पौल, येशू ख्रिस्ताचा प्रेषित." दुसऱ्या वेळेस, "पौल, देवाच्या इच्छेने बनलेला येशू ख्रिस्ताचा सेवक," जेव्हा तो तीमथ्याशी बोलत असतो, तेव्हा वेगळ्या पद्धतीने. आता जेव्हा तो फिलेमोनाला येथे लिहितो, तो म्हणतो, "पौल, येशू ख्रिस्ताचा कैदी." "पौल, एक प्रेषित," मला एका रात्री ह्यावर प्रचार करायला आवडेल. "पौल, एक—एक सेवक," यावर प्रचार करा. आणि मग, "पौल, एक कैदी."

44 परंतु, आज रात्री, एका विषयावर योग्यरित्या विचार करण्यासाठी अनेक तास लागतील, मला आज रात्री, "पौल, एक कैदी," हा विषय घ्यायला आवडेल आणि विषय: *एक बंदिवान*.

आता आपण आपली मस्तके काही क्षणांसाठी झुकवू या.

45 प्रभु येशू, कोणताही मनुष्य, जो शारीरिक दृष्ट्या सक्षम आहे, या बायबलची पाने मागे खेचू शकतो, परंतु केवळ पवित्र आत्माच त्याचा अर्थ लावू शकतो ज्या प्रकाशात ते अभिप्रेत आहे. आम्ही त्याच्याकडे मागतो की आता यावे आणि हे काय संबोधित केले आहे, हे समजून घेण्यास मदत करावी, हा महान, पराक्रमी संदेष्टा, पौल, आणि तरीही तो स्वतःला "एक कैदी," असे संबोधतो. जेव्हा आपण त्याच्यावर अवलंबून आहोत पवित्र आत्मा आपल्याला हे प्रकट करो, येशू ख्रिस्ताच्या नावाने. आमेन.

46 आता मी कल्पना करू शकतो, पौल, जेव्हा त्याने फिलेमोनाला हे पत्र लिहिले, तो तुरुंगात कसा बसला होता, या शहराच्या अंधारकोठडीत, एक—एक—एक कैदी. आणि या शब्दाचा अर्थ काय आहे, हे तो त्याच्या स्थितीवरून चांगले समजू शकला. त्याला गंजांनी—नी—नी घेरले होते. कोणीतरी त्याला मुक्त करू देई तेव्हाच फक्त त्याला मोकळे केले जाऊ शकत होते. आणि कैदी असणे म्हणजे काय हे त्याला माहीत होते. आणि मग, पुन्हा, माझा विश्वास आहे की तो—तो प्रेषित म्हणजे अगदी लहान...त्याच्या सध्याच्या

स्थितीकडे पाहून संबोधित नाही, त्याच्या—त्याच्या देहाचा कैदी असल्याने येथे ह्या—ह्या तुरुंगात बसला आहे. पण माझा विश्वास आहे की तो येशू ख्रिस्ताचा एक बंदिवान म्हणून, त्याची—त्याची मानवी स्थिती, त्याचा—त्याचा—त्याचा आत्मा, त्याची इच्छा, ह्यांचा संदर्भ देत होता.

47 आता, आपण सर्वजण, एक स्वतंत्र विचारसरणी असलेले व्यक्ति म्हणून जन्माला आलो आहोत, ह्यासाठी की आपल्याला हवा तो निर्णय घेता यावा. देव ते न्याय्यपणे करतो. कारण, त्याने प्रत्येक माणसाला त्याच प्रकारे ठेवले पाहिजे, किंवा त्याने चुकीच्या माणसाला ठेवले...त्याने पहिल्या माणसाला चुकीच्या पद्धतीने ठेवले, की त्याने स्वतंत्र इच्छा शक्ति दिली. पहा? आज रात्री, आपण अगदी आदाम आणि हव्वे सारखेच आहोत. वेगळे नाही. चांगले आणि वाईट आपल्यापैकी प्रत्येकाच्या समोर ठेवलेले आहे. जीवन आणि मृत्यु, आपण आपली निवड करू शकतो; ती करणे तुमच्यावर अवलंबून आहे. पहा?

48 आदाम आणि हव्वेने तसेच केले, आणि, पहा, आणि—आणि त्यांनी चुकीची निवड केली. आणि आता, त्याद्वारे, संपूर्ण जात, मानवजातीला, मृत्युखाली, मृत्युच्या शिक्षेखाली ठेवण्यात आले.

49 आणि मग देव मनुष्याच्या रूपात खाली आला आणि त्याने तो मृत्यू घेतला, आणि मृत्यूचा दंड भरला, की...त्याचे लोक जे इच्छितात की—की मुक्त व्हावे ते मुक्त होऊ शकतील.

50 आता, जर त्याने आम्हांला, आदाम आणि हव्वेला जसे केले तसे न घेता, आम्हाला कशातून तरी खेचले, म्हटले, "तुझी पापमुक्त होण्याची इच्छा असो वा नसो मी तुला वाचवीन," मग त्याने आदाम आणि हव्वेला घातले चुकीच्या आधारावर—वर, तुम्ही पाहता. परंतु आपल्यापैकी प्रत्येकाला, ह्या दिवसात, मृत्यु आणि जीवन ह्या दोहोंच्या मध्ये निवड करायची आहे. आपण ते करू शकतो.

51 मी आत्ताच व्यक्त केल्याप्रमाणे, जर तुमचा प्रकाश सिद्ध करील, तर तुमचे जीवन हे सिद्ध करेल की तुम्ही कोणत्या बाजूने आहात. तुम्ही कोणत्या बाजूने आहात असे तुम्ही म्हणता हे मला महत्त्वाचे वाटत नाही. जे तुम्ही, दररोज करता, ते सिद्ध करते की तुम्ही कोण आहात. तुम्ही जुनी म्हण ऐकली आहे, "तुमचे जीवन इतके स्पष्ट आहे, मी तुमची साक्ष ऐकू शकत नाही." पहा? तुमची—तुमची कृत्ये इतकी स्पष्ट आहेत.

52 मी नेहमी ओरडणे आणि उडी मारणे यावर विश्वास ठेवतो. पण मी नेहमी म्हटले आहे, "तुमच्या जीवनापेक्षा उंच उडी मारू नका, कारण जग त्याकडे पाहणार आहे." तुम्हाला समजले? तुम्ही तितकीच उंच उडी मारली पाहिजे जितके तुम्ही जीवन जगता, कारण कोणीतरी तुम्हाला पाहत आहे. आणि आता केव्हा...

53 लोक चर्चमध्ये येणार नाहीत. ते—ते, त्यापैकी बरेच, ते करणार नाहीत. आणि त्यापैकी काही, न येणारे, प्रामाणिक लोक आहेत. त्यांनी चर्चमध्ये इतका भ्रष्टाचार पाहिला आहे, की त्यांना याच्याशी काही घेणे देणे नाही. आणि बऱ्याच वेळा, आम्ही त्याबद्दल सहज विचारांवर बोलत असतो, तुम्ही त्यांना क्वचितच दोष देऊ शकता, पहा, लोकांच्या—च्या तशा वागण्यामुळे. ते स्वतःला ख्रिस्ती म्हणवतात. ते जगाला असलेली सर्वात मोठी अडखळणे आहेत, ख्रिस्ती असल्याचा दावा करणारे पुरुष आणि स्त्री, आणि त्यांच्या दाव्या पेक्षा वेगळे जीवन जगतात. अगदी बरोबर.

54 आता, न्यायाच्या वेळी निराशा पदरी येणार आहे. आता पापी, बेकायदा दारू गाळणारे, जुगारी, व्यभिचारी, त्याची शिक्षा वाचताना ऐकून त्याची—त्याची निराशा होणार

नाही, "अनंतकाळच्या अग्नीत जाण्यासाठी." त्याची निराशा होणार नाही. पण तो मनुष्य जो स्वत:ला एखाद्या ख्रिस्ती विश्वासाच्या मागे लपवण्याचा प्रयत्न करत आहे, त्या मनुष्याची न्यायाच्या दिवशी निराशा होणार आहे. पहा? तो ख्रिस्ती असल्याचा दावा करतो, आणि वेगळ्याच प्रकारे जगतो. त्याच्यासाठी हे चांगले असते की त्याने कधीही कोणत्याही प्रकारचा पत्कर न करता, सुरुवात केली असती, सुरुवात करणे आणि काहीतरी वेगळे जगणे ह्यापेक्षा. कारण, आम्हाकडे असलेला तो सर्वात मोठा अडथळा आहे, असे वक्तव्य करणाऱ्याकरिता की जे म्हणतात की तो—तो—तो ख्रिस्ती आहे, आणि काहीतरी वेगळे जगतो.

55 नेहमी, चमत्कार करण्यासाठी तुमच्याकडे किती सामर्थ्य आहे यावरून तुमच्या जीवनाचा न्याय करू नका. आणि तुम्हाला वचनाचे किती ज्ञान आहे यावरून आम्ही स्वतःचा न्याय करीत नाही. परंतु नेहमी स्वतःचा न्याय करा, मागे वळून पहा आणि परीक्षण करा तुम्ही वर्तमान काळच्या जीवनात कोणत्या प्रकारचे फळ देत आहात. समजले?

56 मी काही काळापूर्वी, फिनिक्स, ॲरिझोना येथे बिझनेसमेनच्या सभेत प्रचार केला होता, येशूचे प्रतिबिंब, ख्रिस्ती जीवन प्रतिबिंबित करते. मी म्हणालो की माझा जन्म केंटकी येथे झाला होता, जेथे ते अगदी मूळचे आहे, विशेषतः जेव्हा मी लहान होतो तेव्हा. आणि या विशिष्ट लहान मुलाकडे एक—एक—एक—एक घर कधीच नव्हते जसे आपल्याकडे येथे आहे, जेथे आमच्याकडे अनेक सुंदर स्त्रिया होत्या ज्यांना संपूर्ण घरभर, आरशातून पहावे लागते, त्यांचे केस व्यवस्थित ठेवण्यासाठी, आणि अशा प्रकारे. पण त्याच्याकडे एक छोटासा आरसा होता, बाहेरील एका झाडावर, जेथे हात धुण्याचे पात्र होते, तेथे एक छोटासा तुकडा होता. जेथे त्याच्या आई आणि वडिलांनी धुतले, आणि त्यांनी त्यांचे केस विंचरले, आणि इत्यादी. झाडावर लावलेल्या जुन्या आरशाच्या या छोट्याशा तुकड्यातून.

57 खरे सांगायचे तर, तशा प्रकारचे घर आमच्याकडे आहे. आम्हा मुलांना, कोणाला आरसा पाहायचा असेल, आम्हाला एक बॉक्स घ्यावा लागत असे आणि धुण्याच्या बाकावर उभे राहावे लागत असे, आणि एका ढिगाऱ्यातून, मी स्वतः उचललेल्या, आरशाच्या एका—एका तुकड्यात पहावे लागत असे. ते केंटकीमध्ये नव्हते. ते इंडियाना येथे, वर युटिका पाईक येथे आहे.

58 आता, या लहान मुलाने स्वतःला असे कधीच पाहिले नव्हते. म्हणून, तो आपल्या आजीला भेटायला, शहरात आला. आणि येथे...हे खोलीच्या फेरफटक्यावर आहे, आजीचे घर होते ज्याच्या दारावर संपूर्ण आरसा होता. आणि म्हणून, लहान मुलगा, त्या—त्या खोलीमधून धावत असता, त्याच्या समोर आणखी एक लहान मुलगा पाहिला. आणि तो लहान मुलगाही, धावत होता. म्हणून त्याला वाटले की काही मिनिटे थांबून तो लहान मुलगा काय करणार आहे ते पाहावे. आणि जेव्हा तो थांबला, तो लहान मुलगा थांबला. जेव्हा त्याने डोकं वळवले, त्या लहान मुलाने त्याचे डोकं वळवलं. त्याने त्याचे डोके खाजवले, त्या लहान मुलाने त्याचे डोके खाजवले. शेवटी, शोध करण्यासाठी, जवळ गेला. आणि तो मागे वळला. त्याची आई त्याच्याकडे पाहत होती, आणि त्याची आजी, आश्चर्याने. म्हणाले, "का, आई, तो मीच आहे."

59 तर मी म्हणालो की, "आपण, देखील, काहीतरी प्रतिबिंबित करत आहोत." पहा? आपले जीवन प्रतिबिंबित होते.

60 आणि आता, जर आपण नोहाच्या काळात असतो, तर आपण कोणाची बाजू घेणार आहोत? नोहा ज्या महान दिवसात होता त्यात आपण कोणती बाजू घेतली

असती? मोशेच्या काळात आपण कोणती बाजू घेतली असती? एलीया, संदेष्ट्याच्या काळात, कोणती बाजू, जेव्हा सर्व जग अस्ताव्यस्त झाले होते एका—एका मोठ्या आधुनिकतावादामध्ये—मध्ये एकत्र झाले होते, आधुनिक ईजबेलप्रमाणे, आणि प्रभूच्या सर्व सेवकांना ऐहिक मार्गाने बाहेर काढले होते? आणि मंडळी आणि याजक सर्व तिला नमस्कार करत होते. तुम्ही लोकप्रियतेची बाजू घेतली असती की एलीयाच्या पाठीशी उभे राहिले असता?

61 आता, प्रभू येशूच्या काळात, जेव्हा आपण या अलोकप्रिय व्यक्तीचा विचार करू, ज्याला जगाने अशिक्षित ठरवले, त्यांना कुठलीही शाळा सापडली नाही जेथे तो गेला होता, आणि सेमिनरीचा अनुभव नाही—नाही. आणि—आणि "अनौरस संतती" ह्या नावाने वाढला. आणि मग, त्यांना शिकवण्यात आलेल्या गोष्टीच्या विरुद्ध शुभवर्तमानाचा प्रचार बाहेर करु लागला. अतिशय...आणि नेते आणि त्यांच्या संघटनांचा निषेध करीत होता, आणि वगैरे–वगैरे.

62 आणि संघटनांनी एक—एक—एक विधान केले होते, "जर कोणी ह्या तथाकथित संदेष्ट्याचे ऐकण्यास गेला तर, सभास्थानातून बाहेर काढले जाईल," जे एक—एक घोर पाप होतं. त्यांना हिशेब द्यावा लागे. केवळ एकच मार्ग होता तो म्हणजे कोकऱ्याच्या रक्ताखाली ते उपासना करू शकत होते. त्यांना ह्या अर्पणाकडे यावे लागे. आणि—आणि मग त्यांना बहिष्कृत करण्यात आले, आणि ही किती मोठी गोष्ट होती.

63 आणि अशा प्रकारे ह्या मनुष्याची उपेक्षा करण्यात आली. आणि तरीही तो पूर्णपणे पवित्र शास्त्रानुसार होता, परंतु त्यांना माहीत असलेल्या मार्गानुसार नव्हता. तुम्ही कोणती बाजू घेतली असती? पहा? आता, नको...तुम्ही आता जगत असलेले तुमचे जीवन, तुम्ही तेव्हा काय केले असते ते आता प्रतिबिंबित करते, कारण तुमच्यात अजूनही तोच आत्मा आहे. समजले? जर तुम्ही आता ती बाजू घेतली, त्यांच्याबरोबर, तेव्हाही तुम्ही तसेच केले असते. कारण, तुमच्यात जो आत्मा आता आहे, तोच आत्मा तेव्हा लोकांमध्ये होता. समजले?

64 भूत कधीही त्याचा आत्मा घेत नाही; तो फक्त एका माणसातून दुसऱ्या माणसावर जातो.

65 देव कधीच त्याचा आत्मा घेत नाही; तो एकाकडून दुसऱ्याकडेही जात नाही. पहा?

66 तर, तोच आत्मा एलीयावर होता, जो अलीशावर आला, तोच योहान बाप्टिस्मा देणाऱ्यावर होता, आणि अशा प्रकारे.

67 तो पवित्र आत्मा, ख्रिस्तावर होता, शिष्यांवर आला, तसेच पुढे, आणि अजूनही लोकांवर आहे. तुम्हाला समजले? देव कधीच त्याचा आत्मा घेत नाही.

म्हणून तेथे आम्हाकडे, एक निवड करणे बाकी आहे.

68 आणि मला—मला येथे पौल कशाचाही पश्चात्ताप करताना, आणि म्हणताना आढळत नाही की तो कैदी असल्याबद्दल त्याला खेद वाटत होता. पण तो स्वतःलाच संबोधत होता...माझा विश्वास आहे की पौलाने, हे पत्र त्या पेनाने लिहिले आहे, तो पवित्र आत्मा होता ज्याने त्याला ते लिहायला लावले. आज रात्री, आपण, आपल्या मजकुराचा संदर्भ घेऊ शकतो, पौलाने असे का केले हे दर्शविण्यासाठी. कारण, ते पवित्र शास्त्रावर आधारित आहे, आणि पवित्र शास्त्र शाश्वत आहे. मला विश्वास आहे की, या धूसर जुन्या तुरुंगात बसून, पौलाने आपल्या सहकाऱ्याला येथे लिहिले, तो, त्याचा भाऊ, तो "येशू ख्रिस्ताचा एक बंदिवान" होता. त्यामुळे, आजूबाजूला काय आहे ते पाहून तो व्यक्त

करू शकला. आता, तो तुरुंगात होता, पण तो जे बोलत होता ते ते नव्हते, हा—हा ख्रिस्ताचा सेवक, हा त्याच्याबरोबर एक सेवक. तो बोलत होता की तो येशू ख्रिस्ताच्या वचनाचा बंदिवान होता, कारण ख्रिस्त हा शब्द आहे.

69 आणि पौल त्याच्या काळात एक महान विद्वान होता. त्याची मोठी महत्त्वाकांक्षा होती. तो एक—तो एक—एक—एक प्रशिक्षिण मिळालेला मनुष्य होता...लोकांद्वारे, गमलीएल नावाच्या व्यक्तिद्वारे, जे त्याच्या काळातील एक उत्तम शिक्षक होते, ज्यामध्ये तो जाऊ शकला असता अशा महान शाळांपैकी एक. उदाहरणार्थ, जसे आपण म्हणतो, व्हीटन, किंवा बॉब जोन्स, किंवा काही उत्कृष्ट मूलभूत शाळा. तो एक वचनाचा सेवक म्हणून—म्हणून—म्हणून शिकवलेला होता. आणि तो सुशिक्षित आणि हुशार होता, आणि एक हुशार मुलगा कदाचित एक दिवस त्याच्या लोकांसाठी एक याजक किंवा महायाजक बनण्याची मोठी महत्वाकांक्षा असलेला.

70 त्याची एक महत्त्वाकांक्षा होती. आणि मग हे मिळवण्यासाठी, या महान महत्वाकांक्षेसाठी त्याला प्रशिक्षित केले गेले होते, आणि त्याचे संपूर्ण आयुष्य व्यतीत केले होते, कदाचित आठ किंवा दहा वर्षांच्या वयापासून, सुमारे तीस किंवा पस्तीस पर्यंत, जेव्हा त्याने कॉलेज पूर्ण केले आणि पदवी प्राप्त केली; आणि त्याचे सर्व डिप्लोमा आणि सर्व काही केले होते, आणि सर्व तेथील—तेथील पादरींशी चांगले संबंध होते, अगदी यरुशलेमच्या महायाजकापर्यंत. त्याला त्याच्याकडून आदेश, वैयक्तिक आदेश, लिखित, आणि या महान शौलावर विश्वास होता, “दमास्कसला जाण्यासाठी आणि त्याच्या म्हणण्याविरुद्ध जे लोक देवाची उपासना करतात त्यांना शोधण्यासाठी, आणि त्यांना बांधून तुरुंगात टाकण्यासाठी.” जर गरज असल्यास, त्याला हवे असल्यास, त्यांना ठार मारण्याचे आदेश होते. तो होता...त्याची मोठी महत्त्वाकांक्षा होती.

71 आणि आता, त्याने जे काही प्रशिक्षण घेतले होते, ते सर्व देवाने त्याच्याकडून काढून घेतले. पहा? आणि जे काही त्याचे उद्दिष्ट होते, आणि त्याच्या वडिलांनी त्यांचे पैसे कशासाठी खर्च केले होते, आणि त्याच्या वडिलांची आणि आईची महत्त्वाकांक्षा, ते सर्व काही त्याच्याकडून काढून घेण्यात आले होते की—की देवाकडे काहीतरी वेगळे होते. म्हणून, तो त्याच्या जीवनातील त्याच्या ध्येयाद्वारे बंदिवान होता, आणि तो येशू ख्रिस्ताचा बंदिवान बनला होता, जो शब्द होता.

72 दमास्कसकडे जाणाऱ्या त्या रस्त्याने पौलाला बदलले. खाली जाताना, सुमारे अकरा वाजता, कदाचित, दिवसाच्या प्रहरी, तो खाली पडला होता. आणि त्याने एक वाणी बोलताना, ऐकली, “शौला, तू माझा छळ का करतोस?” आणि त्याने वर पाहिले. आणि वर पाहत असता, एक यहूदी असल्याने, आणि मला कळले की अग्निस्तंभ हाच परमेश्वर होता ज्याने इस्राएल लोकांना चालविले. कारण ते काय होते हे त्याला माहीत होते.

73 लक्षात ठेवा, या इब्री व्यक्तीने कधीही कोणालाही “प्रभु,” मोठ्या लिपीत एल-ओ-आर-डी, एलोहीम म्हटले नसते, जोपर्यंत त्याला समाधान मिळाले नसते की ते असेच होते, कारण तो प्रशिक्षित विद्वान होता. आणि जेव्हा त्याने वर पाहिले, आणि त्याला हा, एक प्रकाश, अग्नीचा स्तंभ दिसला, ज्याने त्याच्या लोकांना रानांतून नेले होते. आणि तो म्हणाला, “प्रभु,” एलोहिम, मोठ्या लिपीत एल-ओ-आर-...“प्रभु, तू कोण आहेस?”

74 आणि या दैवी ज्ञानी मनुष्याला काय आश्चर्य वाटले असेल, असे म्हणणे, “मी येशू आहे,” ज्याच्या विरोधात तो होता. काय—काय एक वळण आहे! अरेरे! अरेरे! या मनुष्यासाठी हे कितीतरी भयंकर असेल, की त्याच्या सर्व महत्वाकांक्षा, एकाच वेळी,

हे शोधण्यासाठी, ज्याचा तो छळ करीत होता. त्याच्या महत्त्वाकांक्षेने त्याला वळवले होते—त्याला जे करायचे होते त्या मुख्य गोष्टीपासून दूर नेले होते. आणि किती एक—एक मोठा धक्का बसला असावा, ह्या प्रेषिताला, जेव्हा त्याने म्हटले, “मी येशू आहे,” ज्याचा तो छळ करत होता. “तू माझा छळ का करतोस?”

75 आणखी एक लहान नमूना आपण येथे टाकू शकतो. तुम्हाला ठाऊक आहे, जसे ते मंडळीची चेष्टा करतात, ते खरोखर मंडळीची चेष्टा करीत नाहीत, ते येशूची चेष्टा करत आहेत. “तू माझा छळ का करतोस?” मग पौल, आपल्या सर्व बुद्धीने कसा, विश्वास ठेवील की हे होते...की ज्या समुहाचा तो छळ करीत होता तोच देव होता ज्याची सेवा करत असल्याचा त्याने दावा केला होता? मला असे वाटते की, तपशिलात न जाता, मला वाटते की मला येथे काय म्हणायचे आहे हे जाणून घेण्यासाठी आम्ही सर्व पुरेसे प्रशिक्षित आहोत. तीच गोष्ट आजही घडत आहे.

76 पौल, अज्ञानामुळे, तरीही हुशार आणि चलाख होता, अधिक चलाख, त्या अशिक्षित गलतीकरांपेक्षा ज्यांचा तो छळ करत होता, ज्यांनी आधीच त्यांच्या नम्रतेने या माणसाला प्रभु म्हणून स्वीकारले होते. परंतु, पौल, त्याच्या महान शिकवणीमध्ये आणि त्याच्या बुद्धिमत्तेने, ते स्वीकारू शकला नाही. आणि या रस्त्यावर, त्याला काय वळण मिळाले पाहिजे. आणि त्याला आंधळे करण्यात आले होते, जेणेकरून त्याने आपले काम पार पाडू नये, पण त्याला नीट नावाच्या रस्त्यावर एका ठिकाणी नेण्यात आले, एक जणाच्या घरी...

77 आणि मग हनन्या नावाचा, संदेष्टा खाली आला, त्याने दृष्टान्तात पाहिले, तो खाली येताना, तो कुठे होता ते पाहिले, तो जेथे होता तेथे खाली गेला, आणि आत गेला. आणि म्हणाला, “बंधू शौल, खाली रस्त्यावर ज्या परमेश्वराने तुला दर्शन दिले; मला पाठवले आहे, की मी तुझ्यावर हात ठेवावे, आणि तुला तुझी दृष्टी मिळावी आणि पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हावे.”

78 तो कुठे होता ते पहा. पौलासाठी ही काय गोष्ट—काय गोष्ट असेल बरे! पहा? त्याला जे काही करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले होते ते सर्व विरुद्ध होते. त्यामुळे आता, त्याच्याकडे असलेल्या सर्व शिक्षणासह—सह, ते—ते त्याच्यासाठी फक्त शून्य झाले होते.

79 आता, त्याला माहित होते की त्याच्याकडे एक अनुभव होता. त्यामुळे आमच्यासाठी येथे आणखी एक चांगला धडा आहे, तो म्हणजे, केवळ अनुभव पुरेसा नाही. तो प्रभूच्या वचनानुसार अनुभव असला पाहिजे. म्हणून, त्याला हे पाहून, आणि हे समजले की ही एक महान गोष्ट होती, मग, त्याच्या आधी कोणीतरी ते प्राप्त केले होते, त्या—त्या अरेबियातील वाळवंटात त्याला तीन वर्षे सहा महिने लागले; ते—ते बायबल समजण्यासाठी, जसे ते तेव्हा होते, तो जुना करार, आणि तेथे जाऊन, त्याला आलेल्या या अनुभवाची तुलना करण्यासाठी—साठी, आणि पाहण्यासाठी की ते पवित्र शास्त्रानुसार होते की नाही.

80 आता काय झाले असते जर तो म्हणाला असता, “बरं, मला वाटतं की तो फक्त एक छोटासा धक्का होता,” आणि गेला असता? “मी—मी माझ्या बुद्धीप्रमाणे चालणार आहे”?

81 आता, त्याला कशासाठी तरी कैद व्हावे लागले, एक बंदिवान. म्हणून त्याची तुलना केल्यावर, आणि पाहिल्यावर, हयात आश्चर्य नाही की तो इब्रीकरांस पुस्तक, एक वास्तविकतेच्या स्वरूपात लिहू शकला. पहा? तेथे साडेतीन वर्षे, वचनामध्ये गढून गेला होता, आणि शोध करीत होता की ज्या देवाने त्याला बोलावले आहे तोच त्याला

परत घेऊन जात आहे, आणि त्याची सर्व बुद्धीमत्ता बदलत आहे, त्याने आता पर्यंत केलेले सर्व विचार, त्याने घेतलेले सर्व प्रशिक्षण बदलत आहे. त्याच्या सर्व महत्वाकांक्षा, त्याच्यापासून नष्ट केल्या गेल्या, आणि तो एक बंदिवान बनला. देवाचे प्रेम इतके जबरदस्त होते, आणि असे एक—एक प्रकटीकरण, की तो त्यापासून दूर जाऊ शकला नाही.

82 प्रत्येक खऱ्या विश्वासणाऱ्याचा हा वास्तविक अनुभव आहे ज्याला देव भेटतो. आपण—तुम्ही अशा गोष्टीच्या संपर्कात येता जी खूप महान आहे, की तुम्ही...की—की तुम्ही एक—एक बंदिवान बनता, इतर सर्व गोष्टींसाठी. समजले? तुम्ही—तुम्ही स्वत:ला यात कैद करण्यासाठी, सर्व गोष्टींपासून दूर जाता.

83 हे एकदा व्यक्त केले आहे जेथे येशू म्हणाला, "स्वर्गाचे राज्य हे मोती विकत घेणाऱ्या एका व्यापाऱ्यासारखे आहे. मग जेव्हा त्याला तो मोलवान मोती सापडतो, तेव्हा तो मिळवण्यासाठी, तो आपले सर्वस्व विकतो."

84 आणि हाच मार्ग येथे आहे. तुमच्याकडे—तुमच्याकडे बौद्धिक संकल्पना आहे, तुमच्याकडे एक—एक—एक—एक दैवी अनुभव आहे; पण जेव्हा अशी वेळ येते की जेव्हा तुम्हाला—तुम्हाला—तुम्हाला ती खरी वस्तु सापडते, तुम्ही—तुम्ही इतर सर्व काही विकून टाका आणि तुम्ही स्वतःला या मध्ये बंद करा.

85 ते काय होते हे पौलाला माहीत होते. तो—त्याला कळले की तो कशाला तरी जुंपलेला होता. जसे आम्ही एका—एका—एका घोड्याला सरंजामाला जुंपतो, ते—ते काहीतरी खेचण्यासाठी आहे. आणि पौलाला, या अनुभवानंतर, आणि साडेतीन वर्षांच्या हा—हा अनुभव जो त्याने, बायबलचा घेतला, कळले, त्याला समजले की देवाने त्याला निवडले आहे आणि त्याला पवित्र आत्म्याद्वारे जोडले आहे, त्याला आलेला अनुभव, परराष्ट्रीयांच्या समोर हे शुभवर्तमान नेण्यासाठी. आत्म्याने, स्वतः, त्याचा उपयोग केला.

86 आणि, आज, ख्रिस्ताचे सेवक म्हणून, आपण जोडलेले, अडकविलेले आहोत. आपण जाऊ शकत नाही. आपण त्यासह जोडले गेलेलो आहोत, वचनाशी जोडले गेलेलो आहोत. इतर कोणी काय म्हणतो हे महत्त्वाचे नाही, तुम्ही त्याला जोडले गेलेले आहात. त्याबद्दल काहीतरी आहे, की तुम्ही त्यापासून दूर जाऊ शकत नाही. पवित्र आत्म्याद्वारे, तुम्ही त्याच्याशी जोडले गेले आहात, तुम्हाला वचनाशी जोडले आहे. आणि इतर कोणी काय म्हणते ते महत्वाचे नाही, हे देवाचे वचन आहे, ते सर्वकाळ आहे. त्याच्याशी जोडलेले आहात, त्याच्या सोबत जू ठेवण्यात आले, वचनाशी, आत्म्याद्वारे, तो जोडला गेला होता.

87 तो त्या—त्या अरबस्थानाच्या वाळवंटाच्या मागच्या बाजूला तेथे शिकला होता, जेव्हा, त्याच्या सर्व पूर्वीच्या गोष्टी, आणि अनुभव, आणि महत्वाकांक्षा, त्या गोष्टीं त्याच्यापासून दूर करण्यात आल्या होत्या.

88 आता, तेथेच आपल्याला समजते की, आज, प्रथम, आपल्यातून ते काढून टाकले गेले पाहिजे. आणि लोक ते काढू इच्छित नाहीत. मेथोडिस्ट भावाला त्याच्या मेथोडिस्ट शिकवणीला थोडेसे धरून ठेवायचे आहे. उह-हह. बाप्टिस्ट भाऊ त्याच्या बाप्टिस्ट शिकवणीला थोडेसे धरून ठेवू इच्छितो. पहा? परंतु तुम्हाला सर्व गोष्टीं पूर्णपणे काढून टाकल्या पाहिजे, आणि पुन्हा, नव्याने जन्म घ्यावा लागेल. आणि तेथून वर घ्या, पवित्र आत्म्याला नेतृत्व करू द्या. आपण म्हणू शकत नाही, "बरं, आता, माझे—माझे वडील म्हणाले, जेव्हा तो आत आला, चर्चमध्ये गेला, त्याने पाळकांशी हस्तांदोलन केले. तो, तो एक चांगला निष्ठावंत सदस्य आहे." हे कदाचित त्याच्या शर्यतीसाठी योग्य असेल, परंतु आम्ही दुसऱ्या शर्यतीत आहोत. पहा? आता आपण या दिवसासाठी असलेल्या बायबलच्या काळात परत आले पाहिजे.

89 याजकही, जोडलेले होते. परंतु, तुम्ही पाहता, ते दुसऱ्या कालखंडात आले होते, आणि ते—ते त्यांचे जुना सरंजाम काढण्यास आणि नवीन सरंजाम घालण्यात अयशस्वी ठरले.

90 आणि तीच गोष्ट आज आपल्याला आढळते. आपण एका संप्रदाय युगातून आलो, कारण आपण मंडळी युगांतून, बायबल, आणि इतर गोष्टी, सिद्ध केल्या, परंतु आपण आता मुक्त युगात आलो आहोत, जेथे पवित्र आत्मा स्वतः खाली येतो आणि स्वतःला सिद्ध करतो, आणि स्वतःची ओळख करून देतो, त्याने दिलेले प्रत्येक वचन, पूर्ण करतो. अरे, देवा! किती महान समय आहे!

91 आणि त्याला, दुसरी गोष्ट, माहित होती की, त्याला माहित होते की तो त्या ठिकाणी जाऊ शकत नव्हता, की, यास झुंपलेला असल्या कारणाने, की तो करणार नाही...की त्याने केले, पण तरीही त्याला जायचे होते. त्याला माहीत होते की त्याच्या महत्त्वाकांक्षेने त्याला बंधूंमध्ये खेचले जेथे त्याला येण्याचे आमंत्रण देण्यात आले होते, आणि तरीही त्याला आत्म्याने काहीतरी वेगळे करण्यासाठी प्रेरित केले होते. तो स्वतःचा राहिला नव्हता.

92 कदाचित कोणी बोलू शकले असते, "बंधू शौल, बंधू पौल, तुम्ही येथे यावे अशी आमची इच्छा आहे, कारण आमच्याकडे सर्वात मोठे चर्च आहे. आमच्याकडे सर्वात मोठी मंडळी आहे. तुमचे अर्पण उत्तम असेल, वगैरे."

93 पण आत्म्यामध्ये प्रेरित झाल्यामुळे, त्याने विचार केला, "मला तेथे एक भाऊ मिळाला आहे. मला तेथे जाण्यास आणि ह्या भावाला वाचविण्यास, त्याला प्रभूकडे आणण्यास आवडेल." पण, तरीही, आत्म्याने त्याला दुसरीकडे कुठेतरी जाण्यासाठी दबाव टाकला. तो एक बंदिवान होता. योग्य रीतीने.

94 हे देवा, आमच्या स्वतःच्या स्वार्थी महत्त्वाकांक्षेतून, आम्हाला असेच बंदिवान बनव. आणि आपल्या स्वतःच्या निर्णयातून आणि आपल्या चांगल्या विचारसरणीतून, येशू ख्रिस्ताचे बंदिवान बनावे. मला वाटते की ते एक उत्तम विधान होते, की, "मी येशू ख्रिस्ताचा बंदिवान आहे."

95 आणि लक्षात ठेवा, तो शब्द आहे. पहा? इतर कोणाला काय वाटते हे महत्त्वाचे नाही, तो शब्द आहे. पहा? जर तुम्ही वचनाचे बंदिवान असाल, तर कोणताही संप्रदाय तुम्हाला त्यापासून दूर करू शकत नाही. ते आहे—ते वचन आहे. तुम्ही केवळ आहात...तुम्ही त्याचे बंदिवान आहात, एवढेच. ते जसे कार्य करते तसे तुम्ही वागले पाहिजे.

96 आता, त्याला पाहिजे त्या ठिकाणी तो जाऊ शकला नाही, कारण (का?) आत्म्याने त्याला मनाई केली. तुम्हाला आठवते, कित्येक वेळा, पौल कुठेतरी जाण्याचा प्रयत्न करत होता. विचार करीत होता, "तेथे माझी एक महान सभा होऊ शकते," परंतू आत्मा त्याला मना करीत असे. आता, ते स्पष्टपणे सांगते आणि सिद्ध करते की पौल एक बंदिवान होता? येशू ख्रिस्ताचा एक बंदिवान, आत्म्याद्वारे, त्याच्या वचनाशी जोडलेला! अरेरे! मला ते आवडले. उह-हह.

97 तो बांधलेला होता. आणि केवळ, देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठी, त्याला साखळीने आणि प्रेमाच्या बेड्यांनी बांधले गेले होते. तो एक बंदिवान होता. तो प्रेमाच्या बंधनात अडकला होता. तो ख्रिस्ताच्या जोखडात होता. तो इतर कशाही बरोबर जुळू शकत नव्हता. त्याला त्याच्याशी जोडले होते. आणि जेथे नेतृत्व करणारा गेला, तेथे त्याला जावे लागत होते. कुरण कितीही हिरवेगार असले तरी, इकडे *या* बाजूला, किंवा *त्या* बाजूला, नेतृत्व करणारा आणि जोखड ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने त्याला जावे लागले.

98 अरे, आज रात्री, जर आपण, ब्रॅन्हम टॅबरनेकल म्हणून, फक्त बंदिवान बनू शकलो; आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी, आपल्या स्वतःच्या महत्त्वाकांक्षेसाठी, की आपण स्वतःला पूर्णपणे समर्पण करू शकू आणि त्याच्याशी जोडले जाऊ शकू. बाकीचे जग काय विचार करते, बाकीचे जग काय करते, हे महत्त्वाचे नाही, आम्ही प्रेमाच्या बेड्यांनी जोडलेले आहोत, आम्ही बंदिवान आहोत. "माझे पाय ख्रिस्ताशी असे जोडलेले आहेत, ते नाचणार नाहीत. माझे डोळे ख्रिस्ताशी इतके जोडलेले आहेत, की जेव्हा मी रस्त्यावर ह्या आधुनिक करमणूक पाहतो जेथे वस्त्ररहीत होतात, तेव्हा ते माझे डोके वळविते. माझे—माझे हृदय त्याच्या प्रेमात इतके जोडले गेले आहे, की मला या जगासाठी, अधिक प्रेम वाटू शकत नाही. माझी इच्छा त्याच्याशी इतकी जोडलेली आहे, की मला आता माझ्या महत्त्वाकांक्षा काय आहेत हे देखील माहित नाही. फक्त, 'तू जेथे नेशील, मी अनुसरण करीन, प्रभु.' मी एक बंदिवान होईन." पहा?

99 पौल योग्यरित्या एक बंदिवान होता. तो कोणतेही चुकीचे विधान करत नव्हता. पुन्हा एकदा, वचनावर अवलंबून राहण्यासाठी, त्याला पवित्र आत्म्याने प्रशिक्षित केले होते. आता, त्याला एका प्रकारे प्रशिक्षण देण्यात आले होते, परंतू—परंतू देवाने त्याला आता वेगळ्या पद्धतीने प्रशिक्षण दिले होते. त्याला पवित्र आत्म्याने प्रभूवर अवलंबून राहण्यासाठी प्रशिक्षित केले होते, मग त्याची महत्त्वाकांक्षा काहीही असली तरी.

100 आता मी पवित्र आत्म्याद्वारे, मदत करणार आहे, तुम्हाला काहीतरी दाखवणार आहे. पहा? आता फक्त एक उदाहरण घेऊ या.

101 एके दिवशी, पौल आणि सीला, एका विशिष्ट शहरातील रस्त्यावर उतरले जेथे ते पुनरुज्जीवनाची सभा होती. आणि एक छोटी, भूतबाधा झालेली मुलगी त्याच्यामागे धावत राहिली, त्याच्या मागे ओरडत होती. आणि यात शंका नाही पण पौलाला हे माहीत होते की प्रेषित या नात्याने, त्याला अधिकार आहे, त्या दुष्ट आत्म्याला त्या स्त्रीमधून काढून टाकण्याचा. पण तुमच्या लक्षात आले का? तो अनेकदिवस थांबला, जोपर्यंत, अचानक, पवित्र आत्मा त्याच्याशी बोलला, म्हणाला, "हाच तो समय आहे."

102 मग तो म्हणाला, "हे आत्म्या, तिच्यातून बाहेर ये." पहा? त्याला परमेश्वराची वाट पाहणे माहीत होते.

103 आणि तेथे आज बरेच लोक वचनाची निंदा करतात. ते महत्त्वाकांक्षा घेऊन बाहेर पडतात. अशा गोष्टीमुळे किती पुनरुज्जीवन सभा असफल झाल्या आहेत, कारण सुवार्तिक प्रभूला काय म्हणायचे आहे हे जाणून घेण्याची प्रतीक्षा करत नाही! त्यांच्यापैकी काही म्हणतात, "येथे या," आणि ते—ते लगेच जातात कारण त्यांची—त्यांची संघटना सांगते, "जा." आणि पवित्र आत्मा काहीतरी वेगळे सांगेल. तरीही, त्या मनुष्याची राज्याचा पाद्री बनण्याची महत्वाकांक्षा, किंवा—किंवा दुसरे काहीतरी, किंवा कोणी वडील, किंवा कोणी बिशप, किंवा कोणीतरी त्याला ओढील—ओढील, "तुला जायला पाहिजे." आणि तरीही, त्याला चांगले माहित आहे. पवित्र आत्मा म्हणतो, "*येथे* जा." पहा? तो त्याच्या संस्थेशी जोडला गेला आहे. तो संस्थेचा बंदिवान आहे.

104 परंतु जर तो ख्रिस्ताशी जोडला गेला असेल, तर तो पवित्र आत्म्याद्वारे जो चालविला जातो. तो...?...पहा? तो, तो झुंपलेला आहे, एक बंदिवान आहे. इतर कोणी काय म्हणते ह्याकडे लक्ष देऊ नका; ते आहे—तो आहे—तो आहे—दणदणीत पितळ आणि झणझणणारी झांज. तो फक्त देवाचा आवाज ऐकतो, आणि जेव्हा तो बाहेर येतो तेव्हाच तो बोलतो. तो काहीच बोलत नाही.

105 कोणी म्हणे, "अरे, अरे, भाऊ जोन्स!" किंवा, तेथे, बंधू रॉबर्ट्स, किंवा कोणी, आज आपल्या देशातील हे महान पुरुष, टॉमी हिक्स सारखे, किंवा—किंवा—किंवा ओरल रॉबर्ट्स, किंवा—किंवा बंधू टॉमी ऑस्बॉर्न, त्यापैकी काही महान सुवार्तिक. जर कोणी म्हणेल, "म्हटले, टॉमी, येथे ये. तु देवाचा महान पुरुष आहेस." (किंवा तोंडी.) "आणि माझे—माझे एक—एक काका जे येथे बिछान्यावर पडलेले आहेत, ते आहेत—ते सर्व बंधनात आहेत. आणि ते—आहेत ते आजारी आहेत. मला वाटते तुम्ही वर यावे. माझा विश्वास आहे की त्याला बरे करण्याची ताकद तुझ्यात आहे." पहा?

आणि कदाचित पवित्र आत्मा त्याला म्हणेल, "आता नाही."

106 परंतु, तरीही, त्या माणसाच्या मैत्रीखातीर, त्याला त्याच्याबरोबर जाणे भाग आहे. जर तो तसे करीत नाही, तर तो त्या माणसाचा शत्रू बनतो. तो मनुष्य म्हणतो, "बरं, तो *अमुक-आणि- अमुक* कडे गेला, त्या बाळाला किंवा त्या मुलाला बरे केले. मला माहित आहे त्याने केले. आणि मी वर्षानुवर्षे, त्याचा मित्र आहे, पहा, आणि तो माझ्या घरी येणार नाही."

107 परंतु जर त्याला पवित्र आत्म्याने न जाण्यास आग्रह केला असेल, तर त्याने न जाणे चांगले आहे, जर तो देवाशी जोडलेला आहे. त्याचा मित्र, तो प्रेम करतो. परंतु तेथे जाण्यासाठी त्याला पवित्र आत्म्याचे नेतृत्व घेणे चांगले आहे, कारण कसेही, त्याने काहीही चांगले होणार नाही. याचा अनुभव मी खूप वेळा घेतो.

108 पण पौल केवळ आत्मा काय करण्यास सांगतो ह्यावर अवलंबून राहिला. म्हणाला, "आत्म्यावर अवलंबून राहा," तो एके रात्री, प्रचार करीत होता, आणि तेथून निघाला, त्याला एक अपंग मनुष्य दिसला. आणि त्याच क्षणी, आत्मा त्याच्याशी बोलला, आणि तो म्हणाला, "मला जाणवते..." कसे? त्याच प्रकारे बेटावर, ते आदळणार आहेत असे त्याला दिसले. पहा? "मला वाटते की बरे होण्यासाठी तुझ्याकडे विश्वास आहे. आपल्या पायावर उभा रहा. येशू ख्रिस्ताने तुला बरे केले आहे." पहा? तेथे.तुम्ही आहात. तो—तो होता—तो बांधलेला होता. त्याने तेथे एक आठवड्याची संजीवनाची सभा ठेवली असेल आणि काहीही झाले नसेल, परंतु तरीही त्याने पवित्र आत्म्याने सांगण्याची वाट पाहिली. पहा? त्या आवाहनाला तो बांधलेला होता.

109 आता तुम्ही म्हणाल, "बंधू ब्रॅन्हम, तुम्ही रविवारी जे बोललात त्याची तुम्हीच निंदा करत आहात, ज्याची तुम्ही एवढी वाट पाहत आहात."

110 आणि, पण, तुम्हाला आठवत असेल, तो पवित्र आत्मा होता जो माझ्याशी रस्त्यावर बोलला होता, आणि म्हणाला, "मी तुला आजारी आणि पीडित लोकांमध्ये परत पाठवत आहे." पहा? हे पवित्र आत्म्याशी आज्ञाधारक आहे. निश्चित. त्याने मला सांगितल्याशिवाय मी गेलो नाही. **परमेश्वर असे म्हणतो** याची मी वाट पाहत होतो, मला **परमेश्वर असे म्हणतो** मिळेपर्यंत. आता, ते वेगळे आहे. पहा? आता, ते, त्याने फरक पडतो. होय.

111 तो परमेश्वराच्या वचनाची वाट पाहत होता. तो आत्म्याच्या प्रभावाखाली होता, की देवाची आज्ञा पाळावी, तेव्हा तो येशू ख्रिस्ताचा बंदिवान बनला. मित्रांनो, जर आपण केवळ बंदिवान बनू शकलो तर!

112 मला माहित आहे की येथे गरम आहे. पण मी—मला आणखी काही चारित्र्यांची नावे द्यायची आहेत, जर तुम्ही इच्छित असाल. माझ्याकडे येथे सुमारे सहा किंवा आठ लिहून ठेवलेले आहेत. पण मी—मला आणखी एक किंवा दोन चारित्र्यांची नावे देण्यास आवडेल.

113 आपण मोशेचे चारित्र्य घेऊ या. तो एक मुक्तिदाता म्हणून जन्माला आला होता. आणि तो—तो—त्याला माहीत होते की, तो एक सुटका करणारा म्हणून जन्माला आला होता.

114 परंतु मी मोशेबद्दल बोलण्यापूर्वी, मी हे विधान करू इच्छितो, की, देवाला नेहमी एका मनुष्याला घ्यावे लागते, जो त्याची खऱ्या अर्थाने सेवा करेल, त्याचा बंदिवान होईल. त्या मनुष्याला त्याच्याकडे असलेल्या प्रत्येक महत्त्वाकांक्षेचा, त्याच्याकडे असलेल्या सर्व गोष्टींचा त्याग करावा लागतो, प्रत्येक—प्रत्येक गोष्ट, त्याचे जीवन, आत्मा, शरीर, इच्छा, महत्वाकांक्षा, आणि इतर सर्व काही, आणि देवाची सेवा करण्यासाठी ख्रिस्त, जो शब्द आहे, त्याच्यासाठी एक पूर्ण, बंदिवान व्हावे लागते.

115 तुम्हाला कदाचित तुमच्या चांगल्या निर्णयाच्या विरुद्ध जावे लागेल. कदाचित, एखाद्या विशिष्ट संस्थेत, तुम्हाला वाटेल की ते तुम्हाला वर उचलतील आणि तुम्हाला काहीतरी उत्कृष्ट देऊ शकतील, ज्यामुळे तुम्ही चमकू शकाल. पण तुम्ही स्वतःला काय पाहता? काही काळानंतर, तुम्ही स्वतःला पराभूत समजता, जोपर्यंत देव त्याच्यासाठी बंदिवान बनण्यास इच्छुक असा मनुष्य मिळवू शकत नाही.

116 देव बंदिवानाचा शोध घेत आहे. त्याने नेहमीच तसे केले आहे. तुम्ही पवित्र शास्त्रातून ते शोधू शकता. कोणत्याही गोष्टीविरुद्ध, मनुष्याला ख्रिस्तासाठी बंदिवान बनावे लागेल. म्हणूनच, तुम्ही ख्रिस्ताशिवाय कशाशीही जोडले जाऊ शकत नाही; अगदी तुमचे वडील, तुमची आई, तुमचा भाऊ, तुमची बहीण, तुमचा पती, तुमची पत्नी, कोणीही. तुम्ही फक्त ख्रिस्ताशी आणि केवळ त्याच्याशी जोडलेले आहात, तरच देव तुमचा उपयोग करू शकतो. तोपर्यंत, स्वतःहून तुम्ही करू शकत नाही.

117 बाहेर जाऊन, कधी-कधी लोकांशी कठोर बोलतो. पहा? मी—मी तर तुम्हाला सोडवण्याचा प्रयत्न करीत आहे. तुम्हाला प्रथम सुरुवात केली पाहिजे, जसे की कधीकधी ज्या स्त्रिया त्यांचे केस कापतात आणि हे कपडे घालतात, आणि स्वतःला ख्रिस्ती म्हणवतात. म्हणतात, "ती एक लहानशी गोष्ट आहे." बरं, तुम्हाला कुठेतरी सुरुवात करावी लागेल. तर तेथूनच सुरुवात करा, तुमच्या एबीसी सह. पहा? आणि कसेही असले तरी, सांसारिक स्वरूपाकडे दुर्लक्ष करा, आणि ख्रिस्ताचे बंदिवान व्हा. आणि मग असेच चालत राहा, सर्व गोष्टी काढून टाका, शेवटची गोष्ट काढून टाकली जाई पर्यंत. मग तुम्ही आहात—तुम्ही आहात—तेव्हा तुम्ही एक बंदिवान आहात, तुम्ही त्याच्या अधीन होता, तो—त्याने तुम्हाला घट्ट पकडून घेतले आहे.

118 आता, मोशेला माहित होते की तो उद्धारकर्ता म्हणून जन्माला आला होता. हे त्याला माहित होते. आणि तुमच्या लक्षात आले का, जी महत्त्वाकांक्षा मोशेची होती; त्याच्या आईने त्याला सांगितले होते, कारण ती त्याची दाई होती.

119 यात काही शंका नाही, जेव्हा मोशे लहान बाळ जन्मला, तेव्हा त्याची आई म्हणाली, "मोशे, तुला माहीत आहे, जेव्हा...तुझे बाबा, अम्राम, आणि मी सतत प्रार्थना केली. आम्हांला माहीत होतं, आणि वचनात पाहिलं, की तो मुक्तिदाता म्हणून येण्याची ती वेळ आहे. आणि आम्ही प्रार्थना केली, 'देवा, आम्हाला तो मुक्तिदाता पाहायचा आहे.' एका रात्री, परमेश्वराने आम्हाला, दृष्टान्तात सांगितले की, तुझा जन्म होईल, आणि तु तो उद्धारकर्ता असशील. राजाच्या आज्ञेला आम्ही घाबरलो नाही. राजा काय बोलला याची आम्हाला पर्वा नव्हती. तेव्हा, आम्हांला कळले की तुझा जन्म एक उद्धारकर्ता म्हणून झाला आहे. आता, मोशे, आम्हाला माहित आहे की आम्ही तुला योग्यरित्या वाढवू शकत नाही."

120 आता लक्षात ठेवा, ते इजिप्तमध्ये चारशे वर्षे होते. पहा?

121 "आणि आम्हाला—आम्हाला तुला द्यायचे होते—योग्य गोष्ट, योग्य शिक्षण, योग्य प्रशिक्षण. म्हणून, मी तुला घेतले आणि तुला एका लहान टोपलीत ठेवले, आणि तुला नाईल नदीत सोडले. आणि किती अदभूत आहे की, प्रवाहांनी त्या लहानशा टोपलीला बोरूमधून खाली नेले आणि वेगाने, आणि ते अगदी, मैल दूर, खाली आणले, आणि ते थेट फारोच्या राजवाड्यात वळवले, जेथे त्याची...फारोची मुलगी होती, जेथे तिचा आंघोळीचा तलाव होता. आणि ते कसे की—की मला माहित होते की तुला वाढवायला तिला एका स्त्रीची गरज आहे."

122 आणि त्या दिवसांत, अर्थातच, बाळांना वाढवण्यासाठी त्यांच्याकडे या बाटल्या नव्हत्या, त्यामुळे तिला एक—एक मुलाला अंगावर पाजणारी दाई हवी होती. म्हणून...

123 "आणि, मिर्यामिला, मी तिला खाली पाठवले. आणि ती तेथेच उभी राहिली, आणि ती म्हणाली, 'मला माहित आहे की मला एक मुलाला अंगावर पाजणारी दाई कुठे मिळेल,' आणि येऊन मला घेऊन गेली. आणि, मोशे, सर्व दरवाजे बंद आहेत. प्रिय, तू आता सोळा वर्षांचा आहेस, आणि तू फारोचा मुलगा होणार आहेस. आणि एके दिवशी तु तो सुटका करणारा असशील जो येथून ह्या लोकांना बाहेर घेऊन जाणार आहेस."

124 मोशेच्या महत्त्वाकांक्षा वाढू लागतात. "आई, मी शिक्षण घेईन. मी जे काही करू शकतो त्या सर्व गोष्टींचे मी शिक्षण घेईन. तुला माहित आहे मी काय करेन? मी एक लष्करी सैनिकाचे शिक्षण घेईन, आणि या लोकांना येथून कसे बाहेर काढायचे ते मला कळेल. मी एक मोठा सेनापती, बिशप होईन, म्हणजे मला ते कसे करावे ते कळेल. आणि मी करेन—मी ते बाहेर काढीन. मी माझे पीएच.डी किंवा एलएल. मिळविन. मी—मी ते करीन."

125 आवडले "फादर चिनीकी," जर तुम्ही कधी त्याची पुस्तके वाचली. ठीक आहे. तो "सर्व प्रोटेस्टंटना सोडवणार आहे," तुम्हाला माहिती आहे, आणि तो स्वतः, एक झाला. तर, हा महान पाद्री, वर्षांपूर्वी, "फादर चिनीकी," तुम्ही त्याचे पुस्तक घेऊन ते वाचले पाहिजे. ते त्याला, "पिता" म्हणतात. तो केवळ एक बंधू चिनीकी आहे, तो काय होता. आम्ही कुणाही मनुष्याला तसे "पिता," म्हणत नाही. म्हणून आम्हाला ते सापडते की—की आम्ही...तो बायबल वाचणार होता, त्यामुळे तो तेथून बाहेर पडू शकत होता आणि प्रोटेस्टंट धर्म खोटा ठरवून सर्वांना कॅथलिक बनवू शकत होता. आणि जेव्हा तो बायबल वाचायला गेला, पवित्र आत्मा त्याच्यावर आला, आणि त्याला पवित्र आत्मा मिळाला. आणि मग—मग तो त्यांच्यापैकी एक झाला.

126 तर मग हे लक्षात घ्या, की मोशेला सर्व प्रशिक्षण मिळाले. कारण, तो—त्याला माहित आहे. तो इतका हुशार, इतका सुशिक्षित, इतका बुद्धीवादी होता! तोपर्यंत, कोणीही नाही...तो मिसरी लोकांना शिकवू शकत होता. तो पर्यंत, तो त्यांच्या मानसशास्त्रज्ञांना शिकवू शकत होता. लष्करी सामर्थ्य काय होते हे तो त्यांच्या—त्यांच्या सेनापतींना शिकवू शकत होता की. तो एक महान मनुष्य होता. आणि त्याच्या महानतेमुळे, लोकं मोशेला भीत असत. अरे, अशी शिष्यवृत्ती! माझ्या देवा! तो एक आर्चबिशप होता, किंवा कदाचित पोपसारखा होता. तो एक महान व्यक्ती होता. आणि तो एक—एक—एक पराक्रमी मनुष्य होता. आणि त्याला माहित होते की तो हे करण्यासाठी जन्माला आला होता, आणि त्याने ते करण्यासाठी, मोठ्या महत्त्वाकांक्षेने, प्रशिक्षिण घेतले होते.

127 अगदी आजच्या प्रमाणे. मी असे म्हणत नाही की ते पुरुष, या शाळांमध्ये प्रशिक्षण घेत होते, मी तसे म्हणत नाही...जसे ते, आता, येथे पश्चिमेत आहेत, ते दीडशे-दशलक्ष-

डॉलरचे दैवी ज्ञानाचे विद्यालय बांधणार आहेत, पहा, पेंटेकॉस्टल, एक हण–...दिडशे–दशलक्ष डॉलर्सची शाळा. माझ्या दृष्टीने, ते मिशनरी क्षेत्रातले असावेत. पहा? पहा? पहा? पण, काहीही असो, ते तेथून बाहेर आल्यावर काय करतात? ते काय आहेत? रिकीचा समुह. अगदी बरोबर. आणि मग अशा तऱ्हेने ते बाहेर येतात. त्यात नेहमीच असतात, त्यांच्यातील इतर आणि ते तशा प्रकरचेच आहेत. पहा?

128 आता आपल्याला कळते की, जेव्हा, मोशे, त्याच्या सर्व प्रशिक्षणात, आणि आज, सर्व प्रशिक्षण घेऊन, मोठे बिशप बनवले जातात आणि पुढे, महान, उच्च महत्वाकांक्षा, आपण काय करणार? आमची महत्त्वाकांक्षा मोशे सारखीच बनते. पहा?

129 देव, तो मनुष्य आपल्या हातात घेण्याआधी, त्याला त्याची महत्त्वाकांक्षा काढून टाकावी लागली. त्याला त्याचे सर्व प्रशिक्षण काढून घ्यावे लागले.

130 तो बाहेर गेला, आणि त्याने सुटका केली; त्याने एका मिसऱ्याला मारले. आणि तो, आणि जेव्हा त्याने केले, तेव्हा त्याला कळले की तो चुकीचा होता. तो ते करू शकला नाही. तो मार्ग तसा नव्हता. आणि देवाला त्याला वाळवंटात, वाळवंटात, निर्जन ठिकाणी घेऊन जावे लागले.

131 तुमच्या लक्षात आले की, कसे ह्या लोकांना, वेगळ्या प्रकारे, देवाने त्यांच्यासाठी संदेश दिला, तो त्यांना वाळवंटात घेऊन जातो.

132 तो पौलाला वाळवंटात घेऊन गेला, त्याला प्रशिक्षण देण्यासाठी, ते सर्व महान दृष्टान्त काय होते हे सांगण्यासाठी, बाहेर वाळवंटामध्ये. "एका विशिष्ट वाळवंटात जा." आणि देवाने त्याला काय करावे हे पूर्णपणे सांगेपर्यंत तो तेथेच राहिला.

133 आणि मोशेच्या वेळी, त्याने त्याला वाळवंटात नेले. त्याला चाळीस वर्षे बाहेर ठेवले, आणि त्याचे सर्व धर्मशास्त्र आणि त्याच्या सर्व महत्वाकांक्षा काढून टाकल्या. अरे, काय ती वेळ होती की, तो मागे वळून त्याचे अपयश पाहू शकत होता. आणि आज रात्री, आपण कसे हेच केले पाहिजे, जेव्हा आपण आपल्या—आपल्या महत्वाकांक्षा पाहतो.

134 आरोग्य मोहीमेकडे पहा, आणि काही वर्षांपूर्वी जर परमेश्वराने काही केले असेल तर ते पहा, आजारी लोकांना आरोग्य देण्यासाठी, आणि पुढे.

135 प्रत्येकजण, प्रत्येक संस्था, कारण ती त्यांच्या संस्थेत आली नाही, त्यांना बरे करणारा मिळवायचा होता. आणि आम्ही काय केले? एक क्षण आपण त्याकडे बघू या. मोशेने जे केले तेच आम्ही केले आहे. आम्ही बाहेर गेलो आणि एक प्रकारचा चमत्कार घडवण्याचा खूप प्रयत्न केला. "मला रोगाचा वास आला. मी—मी—माझ्या हातात रक्त आले," आणि एक चमत्कार तयार करा. पहा? आणि आपल्याला काय मिळाले? अशा कठोर ताणतणावातील काही काही मनुष्य, खचले आहेत आणि नियमित मद्यपी, मानसिक रुग्ण बनले आहेत, आणि त्यांचे मन बदलले आहे, आणि पेन्टेकॉस्टल उद्दिष्टापाच्या आदेशानुसार, त्यांनी परत सर्व मार्ग बदलले, पुन्हा संस्था आणि गोष्टी बनवण्यासाठी. पहा?

136 आपण काय केले आहे? एका मिसऱ्याला मारले आहे. ते बरोबर आहे. आणि आपण प्रयत्न केला. आपण ताणले. आपण किंमत मोजली. आम्ही कष्ट केले, रात्रभर प्रार्थना सभांमध्ये गेलो, जोपर्यंत आपल्याला वाणी आली नाही. आणि—आणि काहीतरी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, आणि काहीतरी चित्तवेधक आणि या सर्व प्रकारच्या गोष्टी, आणि ते पूर्णतः अपयशी झाल्याचे कळते. आपल्याला परत पश्चाताप करण्याची गरज आहे. बरोबर. होय, महाशय. घाईघाई आणि संघर्ष. ते का सोडुन देऊ नये? तुम्ही तेच

केले पाहिजे, पहा, परत जा आणि सोडून द्या. का, त्यांनी जे केले तेच आपण केले, तेच मोशेने केले. त्याने काही चांगले होत नाही. चाळीस वर्षांनंतर, त्याने स्वत:ला देवाच्या वचनाचा एक बंदिवान म्हणून पाहिले. आपण काय करण्याचा प्रयत्न करतो?

137 जेव्हा, महान आशीर्वाद बाहेर येतो, आणि देवाने आपल्याला सांगितलेल्या या सर्व महान गोष्टींचे प्रकटीकरण: आपला नव्याने जन्म कसा झाला पाहिजे; आणि आपण पवित्र आत्मा कसा प्राप्त केला पाहिजे; येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा; आणि येथील या सर्व गोष्टी.

138 तुम्ही पहा, लोकं, त्या वचनाला, चिकटून राहण्याऐवजी, ते काय करतात? त्यांनी त्यांच्या स्वतःच्या सांप्रदायिक सिद्धांतासह सुरुवात केली, जी आधीच अयशस्वी झाली होती, आणि सत्यासारखे दिसण्यासाठी काहीतरी तयार करण्याचा प्रयत्न करतात.

139 मी तेथेच थांबवतो. पहा? मला खात्री आहे की मला काय म्हणायचे आहे हे जाणून घेण्यासाठी तुम्ही पुरेसे शहाणे आहात. पहा? पण, का, जे पूर्ण झाले आहे ते पहा. त्याचा विचार करा.

140 आज रात्री, आपल्याला काय मिळाले आहे? पण एक—एक—एक संघटित लोकांनी भरलेले राष्ट्र: जे देवाचे शास्त्रलेख नाकारतात; जे त्या—त्या—त्या पवित्र आत्म्याच्या जीवनाला म्हणतात, की, "ते एक—एक दुसऱ्यांच्या मनातील विचार ओळखणे आहे"; जे अशा लोकांना त्यांच्या चर्चमध्ये येण्यास मनाई करतील; आणि ते तुम्हाला सर्पबीज, सार्वकालिक सुरक्षितता, यावर एकही शब्द बोलण्याची परवानगी देणार नाहीत, आणि ज्या गोष्टी पवित्र आत्म्याने प्रकट केल्या आहेत आणि शब्द असल्याचे सिद्ध केले आहे. मी आव्हानांमागून आव्हानं दिली, या आणि ते मला चुकीचं असल्याचे सिद्ध करा.

141 त्यांच्याकडे काय आहे? तीच गोष्ट जी ल्यूथरकडे होती, बाकीच्यांनी, पहा, एका मिसऱ्याला मारले. काय पाहिजे…काय होतं ते? कदाचित त्याने काही माणसाला सुरुवात केली असेल…चोरी करणे थांबवा, किंवा कदाचित त्याच्या पत्नीशी विश्वासू राहीला असेल. पण तुम्ही त्याला त्यातून काय बनवीत आहात? एक चर्च सदस्य. "या आणि आमच्या समुहामध्ये सामील व्हा." पहा?

142 तो दुर्गंधीयुक्त मृत मनुष्य होता, केवळ तीच गोष्ट त्याच्या चाळीस वर्षांच्या प्रशिक्षणाच्या, यशाकडे, बोट दाखवू शकत होती; तेथे पडलेला एक दुर्गंधीयुक्त मिसरी, कुजलेला आणि मृत.

143 आज रात्री तशीच स्थिती आहे. आपण फक्त एकच गोष्ट सूचित करू शकतो, हे संजीवन जे पार झालेले आहे (तथाकथित), हा चर्च सदस्यांचा एक दुर्गंधीयुक्त समूह आहे ज्यांना परमेश्वराबद्दल काहीही माहीत नाही जेवढे इजिप्शियन रात्रीबद्दल हॉटंटॉटला माहीत असेल. बरोबर. ते, त्यांना देवाच्या वचनाबद्दल सांगतील, ते म्हणतात, "माझा त्यावर विश्वास नाही." म्हणतात, "तुम्ही काय म्हणता याची मला पर्वा नाही, माझा त्यावर विश्वास नाही." पहा? पहा? सर्व ताणतणाव आणि संघर्ष आणि आम्हाला मिळालेल्या सर्व गोष्टींकडे परत निर्देशित करणे ही एक भयानक गोष्ट आहे.

144 कदाचित आम्ही एखाद्या मोठ्या शाळेकडे निर्देश करू शकतो, परंतु ती मृत आहे. आम्ही एखाद्या संस्थेकडे निर्देश करू शकतो, परंतु ती मृत आहे. ते दुर्गंधीयुक्त आहे. आम्ही बाहेर पडलेल्या पहिल्या गोष्टीसारखेच अगदी ते आहे. "जशी एक डुक्करिण आपल्या चिखलाकडे जाते, आणि एक कुत्रा आपल्या ओकीकडे जातो." जेव्हा आपण मागे वळतो. एक मृत मिसरी.

145 यात शंका नाही पण कोणीतरी म्हटले आहे, “मोशे, बरं, तुला लोकांबद्दल आणखी भावना नाही का? हे करण्यासाठी तुला बोलावले होते.” कोणीतरी जो मोशेला ओळखत होता, आणि त्याला माहित होते की त्याला त्यासाठी बोलावण्यात आले होते. “आणि करू नको...तु लोकांच्या भावना गमावल्या आहेत?”

“नाही, श्रीमान.”

146 “बरं, हे करण्या ऐवजी, तू बाहेर का पडत नाहीस? आणि तु *ह्यांतून* बाहेर पडण्याचा प्रयत्न का करीत नाहीस? आणि तु बाकीच्यांसोबत का जात नाहीस?”

147 जळत्या झुडूपाचा अनुभव येईपर्यंत, ज्याने वचन प्रकट केले, मोशे मधून सर्व गोष्टी बाहेर काढण्यात आल्या. “मी अब्राहम, इसहाक, आणि याकोब यांचा देव आहे. आणि मी आपले वचन आठवितो. आणि मी त्यांना सोडविण्यासाठी उतरलो आहे. मी तुला ते करायला पाठवत आहे.” तेच होते.

148 त्याने अभिवचन पाहिले, लोकांच्या महत्त्वाकांक्षा किंवा लोकांच्या इच्छा नाही. मग तो काय बनला? त्याला यापुढे मिसरी लोकांचा सामना करायचा नव्हता. त्याला यापुढे या गोष्टीचा सामना करायचा नव्हता. पण तो एक बंदिवान बनला. आमेन. चाळीस वर्षे धावून, रिक्त झाल्यावर, पण नंतर तो जळत्या झुडुपाजवळ, बंदिवान झाला, पराक्रमी मोशे त्याच्या सर्व बुद्धीसह. बायबल म्हणते की मोशे शब्दात किंवा कृतीत, मिसरामध्ये एक पराक्रमी मनुष्य होता.

149 पण जळत्या झुडूपाच्या उपस्थितीत पराक्रमी धर्मशास्त्रज्ञाने काय केले ते पहा. त्याने फक्त आपली असमर्थता कबूल केली. जेव्हा त्याने देवाचा खरा उद्देश पाहिला, तेव्हा त्याने कबूल केले की ते करण्यास तो असमर्थ आहे. जरी, तो त्याला दिलेल्या सर्व दैवी ज्ञानामध्ये प्रशिक्षित होता, त्यांच्या सर्वोत्तम शाळेत प्रशिक्षित होता. पण, तरीही, तो तेव्हा काय करू शकतो जेव्हा...तो अग्निस्तंभ तेथे त्या झुडूपात टांगलेला आहे? म्हणाला, “मला बोलताही येत नाही. अं–हम. परमेश्वरा, मी कोण आहे, की मी जावे?” पहा?

150 “मोशे, तुझे जोडे काढ. मला तुझ्याशी बोलायचे आहे. स्वत:ला रिक्त करा, अगदी तुमचे बूटही. तु आहेस—तु पुन्हा नम्र झाला आहेस. मला तुझ्याशी बोलायचे आहे.”

151 बोलताही येत नव्हते. शेवटी, एक निवडलेला बंदिवान, एक निवडलेला संदेष्टा, जसा पौल निवडलेला होता. मोशे निवडलेला, मुक्तीदाता होता. आणि मग, शेवटी, देवाने त्याच्या निवडलेल्या प्रजेला त्याच्यासाठी बंदिवान बनवले. अरे, हाल्लेलुया! तो फक्त देवाच्या वचनाने चालू शकत होता. “मला कोणी पाठवले असे मी म्हणू?”

“मी.”

“मी कसे करू?”

“मी तुझ्या बरोबर असेन.”

152 “होय, प्रभु, जसे तू म्हणतोस. मी येथे आहे.” अरे, देवा! म्हणजे, तो एक बंदिवान आहे.

153 तो त्याच्या चांगल्या विचारांच्या विरोधात जातो. आता, त्याला सैन्याचे नेतृत्व करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते.“तलवारी, वर कर! धैर्याने तोंड दे!” जाण्यासाठी प्रशिक्षित, “रथ, सर्व क्रमाने! भाले, पुढे! आक्रमण!” अशा प्रकारे तो ते ताब्यात घेणार आहे. हे त्याचे प्रशिक्षण होते.

पण तो म्हणाला, “मी काय उपयोग करणार आहे?”

म्हणाला, “तुझ्या हातात काय आहे?”

154 “एक काठी.” देव कधी कधी अशा गोष्टी करतो, ज्या मानवी मनाला हास्यास्पद वाटतात. पहा? हातात त्याची काठी आहे. खाली लटकलेल्या मिश्या. ऐंशी वर्षांचा. त्याची बायको खेचरावर; मुल तिच्या मांडीवर बसलेले. लहान, म्हातारपणामुळे दुर्बल झालेले हात; एक काठी. केवळ त्याचे डोके वर, कारण त्याच्याकडे **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** ते होतं. का? शेवटी तो पूर्ण स्थिर होता.

155 तो एक बंदिवान होता. “जेव्हा वचन मला चालविल तेव्हाच मी चालेन. जेथे वचन बोलेल तेथेच मी बोलेन.”

“तू कोठे जात आहेस?”

156 “मला एक कामगिरी सोपवलेली आहे: फारोसमोर उभे राहा आणि या काठीने, त्याला दाखव की मला देवाने पाठवले आहे.” आमेन.

“त्यानंतर तु काय करणार आहेस?”

“मी हे केल्यानंतर, तो पुढील गोष्ट दाखविल.”

157 तेथे तू आहेस. आज रात्री, तुम्हाला फक्त एक गोष्ट करायची आहे, पहिली पायरी: आत्मसमर्पण करा, एक बंदिवान बना. स्वतःचा किंवा इतर गोष्टींचा विचार करू नका. बंदिवान व्हा.

158 मोशे एक बंदिवान बनला, त्याने कबूल केले की तो बोलू शकत नाही. शेवटी, जेव्हा देवाने त्याला त्याच्या हाती घेतले, जेथे तो केवळ देव नेईल तेथेच जाऊ शकत होता. कुठे, त्याने त्याला शब्द सांगितला. तो शब्द आहे हे त्याला माहीत होते, तेव्हा त्याने स्वतःला शब्दाच्या स्वाधीन केले. आणि तेथे पवित्र आत्म्याने, देवाने, मोशेला देवाच्या इच्छेशी जोडले.

159 तीच गोष्ट त्याने पौला बरोबर केली. ते बरोबर आहे? त्याने पौलाचा उपयोग केला; थोडा, वाकड्या–नाकचा, तिरसट बोलून खिल्ली उडविणारा यहुदी, होय, पीएच.डी. आणि एलएल.डी. पदवी घेतलेला. पण तो म्हणाला, “त्याला माझ्या वचनासाठी किती दु:ख सोसावे लागेल लागतो हे मी त्याला दाखविन.” पहा? आणि तो...

160 आणि मग पौलाने तेथे बसून वचन पाहिले, आणि त्याला समजले की तो येशू होता, मग त्याने आपले हात वर केले आणि त्याच्याशी एक झाला. देवाच्या प्रेमाने त्याला वचनाशी जोडले. “तो परराष्ट्रीयांसमोर माझ्या नावाची साक्ष देणार आहे.” तेथे तो गेला.

161 “मोशे, मी तुझ्या पूर्वजांचा देव आहे. मी अब्राहाम, इसहाक, आणि याकोबाचा देव आहे. मला स्मरण आहे की मी त्यांना अभिवचन दिले आहे, आणि त्या अभिवचनाची वेळ जवळ आली आहे. आणि मी माझ्या लोकांच्या पीडा पाहत आहे. मला माझ्या वचनाचे स्मरण आहे. आणि मी तुला जोडण्यासाठी खाली आलो आहे. वचन काय म्हणाले हे तुम्हाला ठाऊक आहे. मी तुला तेथे खाली जाण्यासाठी, सामर्थ्य देण्यासाठी, तुला तेथे जाण्यासाठी आणि माझ्या लोकांना सोडवण्यासाठी जोडले आहे. आणि ती काठी आपल्या हातात घे, साक्षीदार म्हणून, कारण तु तिच्याद्वारे केलेला चमत्कार पाहिला आहे.” अगदी दाविदासारखा, गोफणीसह. पहा?

162 स्वत:ला झुंपले, आणि तो खाली गेला. शेवटी, देवाकडे एक मनुष्य होता जो त्याच्या अधीन होता, त्याला जोडलेला होता, आणि जोपर्यंत देवाच्या वचनाने त्याला चालविले नाही तोपर्यंत तो चालू शकत नव्हता. आज, जर लोकांनी तसे केले असते तर! मग,

तो त्याचा बंदिवान होता, प्रेमाचा बंदिवान होता, प्रेमाच्या बंधनात जोडलेला होता, देवाबरोबर—बरोबर, जसा पौल देवाच्या प्रेमाच्या बंधनात जोडला गेला होता.

163 पौला प्रमाणेच, दोघांनीही त्याच पद्धतीने प्रशिक्षण मिळाले. तुम्हाला ठाऊक आहे, मोशेने, इस्राएल लोकांना सैनिकी सामर्थ्याने सोडविण्याचे प्रशिक्षण घेतले. पौलाने त्यांना रोमी लोकांच्या हातातून मोकळे करण्याचे प्रशिक्षण घेतले, त्या दिवसांतील जगातील त्याच्या महान याजकीय शक्तीद्वारे. गमलीएलच्या अंतर्गत असणाऱ्या, प्रशिक्षणाच्या उत्तम शाळा.

164 आणि दोघेही वाळवंटात गेले, हं—हं; परिवर्तीत मनुष्य होऊन परतले. त्या दोघांनी अग्निस्तंभ पाहिला. आणि ते दोघेही संदेष्टे होते. ते बरोबर आहे? ते दोघेही, संदेष्टे. आणि त्या दोघांशी अग्निस्तंभ बोलला होता, ते अगदी बरोबर आहे, ते मुक्तीदात्या करिता आले होते. तेथे ते होते; एका वाळवंटात गेले. त्यांची घरे सोडली आणि वाळवंटात गेले, शोध घेण्यासाठी. देवाची इच्छा शोधण्यासाठी, त्यांचे लोक आणि सर्व काही सोडले. पहा?

165 त्यांना एकप्रकारे प्रशिक्षण देण्यात आले होते; देवाने त्यांना दुसऱ्यामध्ये बदलले. आणि त्यांना पूर्ण बंदिवान बनावे लागले, त्यांना जसे वागायचे होते तसे वागू नये, तर देवाने त्यांना जसे वागावे असे वाटते तसे वागावे. तो काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे.

166 हे बनवायला, आपल्याकडे अजून दहा मिनिटे आहेत का?

167 मी त्वरीत दुसऱ्या चारित्र्याकडे जाईन. मला आता माझ्यापुढे एक दिसत आहे. त्याचे नाव योसेफ आहे. तो निवडलेला पुत्र होता. तो येशू ख्रिस्ताची एक परिपूर्ण दर्शक होता. तो संदेष्टा म्हणून जन्माला आला होता. तो एक संदेष्टा, देखील होता. पहा? आणि आता तो दृष्टान्त पाहू शकत होता. आणि जेव्हा तो अजून एक लहान मुलगा होता, तेव्हा त्याने एका दृष्टांतात स्वतःला सिंहासनावर बसलेले, आणि त्याचे भाऊ त्याला नमन करताना पाहिले. पहा? पण पहा. तो बनला…तो एक थोर मनुष्य असल्यासारखे त्याला वाटले. पहा? ते सर्वजण…

168 पण देवाला काय करायचे होते? त्याने तीच गोष्ट केली जी इतरांच्या बाबतीत केली. कारण, मोशे सुटका करणारा होता, पौल सुटका करणारा होता, आणि आता योसेफ सुटका करणारा होता. त्याने आपल्या लोकांना दुष्काळापासून वाचवले.

169 देवाला त्याला काय करायचे होते? त्याला तुरुंगात टाका, सरळ तुरुंगात टाका. होय, श्रीमान. लक्षात ठेवा, त्याला त्याच्या भावांनी एका मिसऱ्याला विकले होते. त्यांनी त्याला पोटीफरला विकले. आणि पोटीफरने त्याला थोडीशी मोकळीक दिली, आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहिती आहे, की ती त्याच्याकडून घेतली गेली होती. आणि तेथे तो तुरुंगात रडत, रडत बसला. देवाला ते काढून टाकावे लागले.

170 आता लक्ष द्या. पण, सर्व समयी, माझा विश्वास आहे, तो, त्या तुरुंगात, त्याला तो दृष्टान्त आठवत असे ज्यात म्हटले होते की तो सिंहासनावर बसणार आहे, आणि त्याचे भाऊ त्याला नमन करणार आहेत, कारण त्याला माहीत होते की त्याची देणगी देवाकडून आली आहे. आणि त्याला माहित होते की हे घडलेच पाहिजे.

171 जर आपण ते फक्त आपल्या मनात ठेवू शकलो, आणि देवाच्या वचनानुसार, की या अंतिम दिवसांत त्याच्याकडे एक चर्च असणार आहे, त्याच्याकडे लोकं असणार आहेत. आणि या गोष्टी ज्याचे त्याने अभिवचन दिले आहे, तो त्या पूर्ण करणार आहे. तो म्हणाला आहे की तो करील, आणि आम्ही त्या काळात राहात आहोत. आम्ही तेथे आहोत.

तो फक्त आता आपल्याला खरे बंदिवान बनवण्याचा प्रयत्न करीत आहे, त्याच्याबरोबर बंदिस्त असलेले.

172 तुम्ही ते जुने गीत तुम्ही गाताना ऐकले आहे, "आणि तेव्हा मी देवासह बंदिस्त आहे"? मला देवासोबत बंदिस्त व्हायचे आहे. आता, येथे मी याबद्दल विचार केला आहे. देवासह बंदिस्त असणे, दुसरे काही नाही, आणि जेव्हा देव चालण्यास सांगतो तेव्हाच तुम्ही चालता. तुम्ही फक्त देवाने सांगितल्याप्रमाणे करता, पहा, तेव्हा तुम्ही देवासह बंदिस्त आहात.

173 आता लक्षात ठेवा, तो विचार करत होता. तो स्वतःशीही, पूर्ण अपयशी ठरला. त्याला जे काही माहित होते, जे काही त्याला समजले होते, आणि सर्व काही, तो पूर्णपणे अपयशी ठरला. त्याचा काही उपयोग झाला नाही. कोणीही त्याचे ऐकणार नाही अशा परिस्थितीत त्याला ठेवण्यात आले होते. तो एक कैदी होता. पहा? अशा परिस्थिती त्याला ठेवण्यात आले होते, की अविश्वासू विश्वास ठेवणार नाहीत. मला काय म्हणायचे आहे ते तुम्ही समजत आहात का? त्यांच्या सेवकाईचा काहीही परिणाम होत नव्हता. लोकांनी तोंड फिरवले. तुरुंगात ते त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. त्याच्या सेवेने काय फायदा होईल? तो कदाचित तुरुंगाच्या दाराशी उभा राहून त्यांना उपदेश करी असे; ते रस्त्यावरून चालत असतील. पहा? पण तो एक बंदिवान बनतो. आणि ते चाक व्यवस्थितपणे फिरेपर्यंत, देवाने त्याला, एक बंदिवान ठेवले आहे. म्हणाला, "हा माझा माणूस आहे." गौरव! संपूर्ण अपयश!

174 शेवटी, देव त्याच्या तुरुंगात त्याच्याकडे आला. पौलाप्रमाणे, इतर सर्वांप्रमाणे, तो त्याच्याकडे आला. आणि त्याला तेथून बाहेर काढण्यासाठी, त्याने त्या भेटवस्तूचा उपयोग केला जी त्याने त्याला दिली होती. ते बरोबर आहे. त्याने त्याला त्याच्या तुरुंगातून बाहेर आणले. त्याने काय केले? जसे त्याला त्याच्या तुरुंगातून आणताच, त्याला राजाकडून अधिकार देण्यात आले, तो ज्याच्या अधीन होता, त्याच्या बाजूला तो बसला. त्याला तुरुंगातून आणण्यात आले आणि त्याला अधिकार देण्यात आला, तो जे काही बोलेल, ते घडले पाहिजे. आमेन.

175 त्याच्या तुरुंगात, त्याला सतत स्मरण होते, त्याचा जन्म एका उद्देशासाठी झाला आहे. तो एका राजाच्या बाजूला बसणार होता. बाकी सगळे त्याच्यापुढे गुडघे टेकणार होते. त्याच्या दृष्टांतात त्याला तसे सांगितले. आमेन. पण त्याचा दृष्टान्त पूर्ण होण्याआधीच, त्याला एक बंदिवान व्हावे लागले. आमेन. आणि मग तो राज्यकर्ता बनला. आणि जेव्हा तो त्याच्या तुरुंगातून आला, आणि देवाच्या वचनाचा बंदिवान बनला, की तो फक्त तेच बोलू शकला जे देवाने त्याच्या मुखात घातले, मग देव त्याच्यामधून चालला.

176 लक्ष द्या, मोशेकडे फारोच्या सरदारांना स्वतःच्या इच्छेनुसार बांधण्याचा अधिकार होता. "जर तुम्ही या डोंगराला म्हणाल तर, 'उपटून जा.'" उह–ह, उह–ह, त्याच्याकडे फारोच्या सरदारांना बांधून ठेवण्याचा अधिकार होता. मग ते डिकन होते, किंवा वडील, किंवा ते त्या—त्या राज्याचे प्रतिनिधी किंवा ते जे काही होते. तो म्हणे, "मी तुला बांधतो," आणि ते बांधले गेले. तेच होते. तो स्वत:च्या शब्दाने, स्वत:च्या मर्जीने ते करू शकत होता. आमेन. देवाचा गौरव असो!

अरे, माझ्याकडे अजून तीन मिनिटे आहेत, म्हणून मी माझा शब्द पाळतो.

177 आता आपण पाहतो, की तो—तो देवाचा बंदिवान बनला आहे, जगातील कैद्यापासून. पौला...पासून, त्याच प्रकारे. आणि मोशे, त्याच प्रकारे, एका कैद्यापासून त्याच्या स्वत: च्या विचारसरणीपर्यंत, देवाचा बंदिवान बनला. आणि जेव्हा तो बाहेर

आला, तेव्हा त्याच्याकडे देवाचे सामर्थ्य होते. आणि जेव्हा तो पौल बनला...जेव्हा मोशेची स्वतःची विचारसरणी, तो त्याला शरण गेला, आणि ती काढून टाकली, तो ख्रिस्ताच्या वचनाचा बंदिवान बनला. फक्त चालू शकत असे जेथे...

तुम्ही म्हणता, "ख्रिस्त?"

178 "त्याने ख्रिस्ताप्रीत्यर्थ विटंबना सोसणे मिसरातील धनसंचयापेक्षा अधिक मोठी संपत्ती आहे असे गणले." त्यामुळे पौलाप्रमाणेच, तो ख्रिस्ताचा बंदिवान होता.

179 लक्षात ठेवा, ते तिघेही संदेष्टे होते. पहा? आणि देवाच्या इच्छेचे आणि मार्गांचे बंदिवान बनण्यासाठी, त्यांना त्यांची स्वतःची विचारसरणी काढून टाकावी लागली.

180 मग, आपल्याला लक्षात येते की, आता, त्याच्या स्वतःच्या शब्दावर बांधून ठेवण्याचा अधिकार त्याच्याकडे होता. त्याच्या स्वतःच्या शब्दावर, त्याला सोडण्याचा अधिकार होता. तो म्हणू शकला, "माझ्या राजाच्या नावाने, मी तुला सोडतो." आमेन. फारोने योसेफाला आपला पुत्र बनवले.

181 ख्रिस्त त्याच्या, प्रेमाच्या बंदिवनांना, त्याचे पुत्र बनवतो. आणि तो त्यांना अधिकार देतो, तेच जे त्याच्याकडे होते. संत योहान 14:12, "जो माझ्यावर विश्वास ठेवतो," पहा, "ही जी कामे मी करतो तोही करील. यापेक्षाही मोठी तो करील." आता ख्रिस्ताच्या प्रेमाचा बंदिवान त्याचा राजा, जो ख्रिस्त आहे, त्याच्याद्वारे सामर्थ्यवान बनतो. आमेन. "आणि मी तुम्हाला खचित सांगतो, जर तुम्ही या डोंगराला म्हणाल, 'तु उपटून टाकला जा,' आणि आपल्या अंतकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील, त्याच्या शब्दप्रमाणे घडून येईल. जर तुम्ही माझ्यामध्ये राहाल, आणि माझे वचन तुमच्यामध्ये. तर तू माझ्याशी जोडलेले आहात," कारण तो आणि त्याचा शब्द एकच आहे. "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता. शब्द देही झाला आणि आम्हामध्ये वस्ती केली. काल, आज आणि युगानुयुग सारखा! जर तुम्ही माझ्यामध्ये राहाल," *येथे* आणि *तेथे* नाही, "तुम्ही मजमध्ये आणि माझे वचन तुमच्यामध्ये; तुम्हाला काय हवे आहे ते मागा, किंवा तुम्हाला काय हवे ते सांगा, ते तुमच्यासाठी केले जाईल." त्याच्याकडे अधिकार होता.

182 लक्ष द्या, तो बाहेर येण्यापूर्वी, त्याला बाहेर काढून साफसुफ नकार द्याला लागला. त्याच्या राजाला भेटण्यापूर्वी काही गोष्टी नाकाराव्या लागल्या. पहा?

183 अरे, देव कधी कधी त्याच्या लोकांना अशा प्रकारे बाहेर काढतो, आणि त्यांच्या स्वतःच्या काही इच्छा काढून टाकतो, त्यांना दाखवतो की त्यांना जे करावेसे वाटते ते करू शकत नाहीत. मला काय म्हणायचे आहे ते तुम्हाला माहीत आहे. ते नाहीत—त्यांना जे करायचे आहे ते करण्याचे स्वातंत्र्य त्यांना नाही. त्यांना पूर्ण सामर्थ्य मिळण्या आधी आणि ख्रिस्ताचे प्रेम–गुलाम बनण्याआधी, त्यांना नकार करावा लागेल आणि नंतर सादर करावे लागेल. कधीकधी ते करण्यासाठी, त्यांचा इन्कार करण्यासाठी, तो त्यांना वाळवंटात घेऊन जातो. आणि मग त्यांना बाहेर आणतो, अभिषिक्त, त्याने त्यांना नेमून दिलेला उद्देश पूर्ण करण्यासाठी. मला काय म्हणायचे आहे ते पहा?

बंधूंनो, आपण अंतिम समयात आहोत.

184 स्मरण करा, इतर सर्व समयात, त्याने काय केले आहे. त्याला नेहमी एका मनुष्याला घेऊन त्याला त्याचा बंदिवान बनवावे लागते, त्याच्या इच्छेचा त्याग करावा लागतो. त्याला माहित असलेल्या सर्व गोष्टींचा त्याग करावा लागला, त्याचे सर्व प्रशिक्षण, सर्वकाही विसरून जावे लागले, देवाची इच्छा जाणून घेण्यासाठी, आणि देवाला अनुसरण्यासाठी.

185 एकाच वेळी, तो मनुष्याच्या आणि देवाच्या कोणत्याही गोष्टीचे पालन करू शकत नाही. ते एकमेकांच्या, अगदी विरुद्ध आहे. तुम्ही एकाच वेळी पूर्वेला आणि पश्चिमेला जाऊ शकत नाही. तुम्ही एकाच वेळी उजवीकडे आणि डावीकडे जाऊ शकत नाही. तुम्ही एकाच वेळी बरोबर आणि चूक करू शकत नाही. तुम्ही एकाच वेळी मनुष्य आणि देवाचे अनुसरण करू शकत नाही. नाही, श्रीमान. तुम्ही एकतर देवाचे अनुसरण करत आहात किंवा मनुष्याचे अनुसरण करत आहात.

186 आता, जर तुम्ही देवाचे अनुसरण करत असाल आणि स्वतःला देवाच्या स्वाधीन केले असेल, तर तुम्ही त्या देवाचे, त्या शब्दाचे, त्या इच्छेचे बंदिवान व्हाल. इतर काय बोलतात ह्याने काहीही फरक पडत नाही, तुम्ही एक—एक बंदिवान बनता.

187 लक्षपूर्वक ऐका. आपण अंतिम समयात आहोत. आणि मी हे आदराने आणि आदर देऊन म्हणेन, कारण शेवटची दोन मिनिटे लवकरच येत आहेत. पाहा. माझ्या मते, देव काय करील, आणि काय केले पाहिजे, आणि या शेवटच्या दिवशी करेल, ते म्हणजे कापणीसाठी साधन शोधेल. त्याला खळ्यात झोडपणी करण्यासाठी, एक साधन शोधावे लागेल. कोणताही शेतकरी, जेव्हा तो त्याच्या कापणीसाठी जातो, तेव्हा त्याच्याकडे ते करण्यासाठी एक साधन असणे आवश्यक आहे; नक्कीच, त्याच्याकडे एक धारदार विळा किंवा काहीतरी, धान्य बाहेर फेकण्यासाठी, काहीतरी साधन असणे आवश्यक आहे. आणि पीक कापणीसाठी तयार आहे.

188 देवा, आम्हाला तुझ्या हातात घे. आम्हाला तुझ्या प्रेमाचे दास बनव. आज आपण राहत असलेल्या या पापी, शापित पृथ्वीला जाणीव करून देण्यासाठी, आमचा साधन म्हणून उपयोग कर, की येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे.

189 माझ्यासाठी, देवा, मला एक बंदिवान होऊ दे. जर माझे सर्व बांधव मला नाकारतील, जर माझे सर्व मित्र मला नाकारतील, तरी मला येशू ख्रिस्ताचा आणि त्याच्या वचनाचा बंदिवान व्हायचे आहे, जेणेकरून मी त्याच्या वचनाला पवित्र आत्म्याद्वारे चिकटून राहील, ह्यासाठी की पवित्र आत्म्या देवाच्या वचनाची पुष्टी त्याच गोष्टी करण्याद्वारे करील ज्या त्याने करण्याचे अभिवचन दिले आहे. मला येशू ख्रिस्ताचा बंदिवान व्हायचे आहे.

आपण प्रार्थना करु या.

190 मला आश्चर्य वाटते की, आज रात्री, आपण नतमस्तक झाले असताना, जर काहीतरी वेगळे होण्याची, ती महत्वाकांक्षा आपल्यामध्ये आहे, किंवा कदाचित एखाद्या गोष्टीबद्दल आपण विचार करत असू, एक स्वार्थी गोष्ट, आश्चर्य वाटेल जर आपण ते बाजूला ठेवू शकलो नाही.

191 मला आश्चर्य वाटेल जर येथे एखादा तरुण मुलगा, आज रात्री, आजूबाजूला पाहून, म्हणेल, "जेव्हा मी मोठा होईन, मी होणार आहे, मी एक *अमुक-अमुक* होणार आहे." तुम्हाला तुमच्या जीवनात देवाच्या इच्छेची जाणीव होऊ लागली असेल तर आश्चर्य वाटेल, आणि म्हणाल, "नाही, नाही. उह-हह, हह-उह. मी—मी...माझ्या महत्वाकांक्षा आता संपल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून, पवित्र आत्मा माझ्याशी बोलत आहे. मला—मला—मला—मला स्वतःला देवाला अर्पण करायचे आहे, या शेवटच्या दिवसाचे एक ठणकावणारे साधन बनायचे आहे."

192 काही तरूण मुलींना कदाचित एक उत्तम चारित्र्याची स्त्री बनण्याची महत्वाकांक्षा असेल, किंवा—किंवा कदाचित एक सुंदर लहान मिसस बनायचे असेल, किंवा कदाचित एके दिवशी हॉलीवूडला तुमचे करिअर बनवायचे असेल, मला—मला आश्चर्य वाटेल जर तुम्ही आता तुमची महत्त्वाकांक्षा देवाच्या आणि त्याच्या वचनाच्या उपस्थितीत सादर

करण्यास तयार नसाल, तुमच्या स्वतःच्या आयुष्यात देवाची हाक ऐका. तुम्ही कोण आहात हे देव जाणतो.

193 मला आश्चर्य वाटते की जर मंडळीमध्ये कुठेतरी एक जवळचा सेवक, किंवा एक दास, कार्यकर्ता असेल. कधी तरी, मी फक्त इथे येतो. मी—मी आज रात्री, येथे बसलेल्या एक तृतीयांश लोकांना ओळखत नाही, पण मी...हे थोडे मूठभर जे येथे आहे. मला आश्चर्य वाटते की अशी एखादी व्यक्ती असेल का, ज्याला तुम्ही म्हणण्यास तयार व्हाल, "कोण काय म्हणेल याची मला पर्वा नाही. मी आता देवाचा दास आहे. मी—मी—मी पर्वा न करता, त्याच्या वचनाचा प्रचार करणार आहे. मला काही फरक पडत नाही, माझ्या—माझ्या संस्थेने मला बाहेर काढले, मी तरीही त्या वचनाबरोबर राहणार आहे. मी—मी ते करणार आहे. माझी इच्छा ही देवाची इच्छा आहे. देवाची इच्छा ही माझी इच्छा आहे. मी येशू ख्रिस्ताचा बंदिवान होणार आहे. त्याच्या कृपेने आणि सहाय्याने, मी ते करेन."

194 आपण आपली मस्तके झुकविली असताना, याचा विचार करु या. आज रात्री किती जणांना ती महत्त्वाकांक्षा आहे? हात वर कराल का. माझेही आहेत. मी सर्व समर्पित करतो. आपण आपली मस्तके झुकविली असताना, आता हळूहळू, तुम्ही आता विचार करीत असता, तुम्ही प्रार्थना करताना.

मी सर्व समर्पित करतो,
मी सर्व समर्पित करतो,
सर्व तुला, माझ्या धन्य तारणहार,
मी सर्व समर्पित करतो.

मी समर्पित–...

195 तुम्हाला खरंच म्हणायचं आहे का? "मला बंदिवान व्हायचे आहे."

मला...

"प्रभु, मला घे. आज रात्री, मला कुंभाराच्या घरी घेऊन जा. मला संपूर्ण तोडून टाक, आणि मला पुन्हा तयार कर...?..."

...तुला, माझ्या धन्य तारणहार,
मी सर्व समर्पित करतो.

196 स्वर्गीय पिता, गाणे चालू असताना, मला यावेळी सर्वात फायदेशीर वाटले, की मी—मी गाणे थांबवून तुमच्याशी काही क्षण बोलावे. जेव्हा लोक विचार करीत आहेत, "मी सर्व समर्पित करतो," पित्या, आपण हे करू या, तशी हे करण्याची ही आपली शेवटची संधी आहे. आपण प्रामाणिकपणे, प्रभूच्या मेजाजवळ येऊ या, जसे ते होते, शुद्ध वस्त्राने, शुद्ध आत्म्याने, शुद्ध इच्छेने, शुद्ध महत्वाकांक्षा, स्वतःला समर्पण करण्यासाठी.

197 आणि आपल्याला त्याच्याशी, देवाच्या वचनाशी एकत्र जोडून, देवाला त्याचे वचन घेऊ द्या. आणि पवित्र आत्मा आम्हांला घेवो, जसे आम्हाला ते जू आमच्या हृदयाभोवती जखडलेले समजते, "आज रात्रीपासून, मी तुला तुझ्या वचनानुसार घेतो. आता स्वतःचा विचार करू नका. माझे विचारांचा विचार करा. माझ्या इच्छेचा विचार करा. मी तुमचे नेतृत्व करीन." देवा, आमच्यापैकी प्रत्येकासाठी हा अनुभव असेल असे कर.

198 येथे बसलेले हे तरुण; पती आणि पत्नी; आणि काही जे पती–पत्नी होणार आहेत. इथे अनुभवी माणसे बसलेली आहेत, ते सेवक आहेत, ह्या मार्गात आहेत. आणि, प्रभु, येथे भाऊ नेव्हिल आहेत, मी, शिडीवरून वर जात आहोत. आमचे दिवस आता मोजले जात आहेत. आमची पावले आम्ही चाललो त्यापेक्षा अधिक काळजीपूर्वक चालत आहोत.

आम्ही कुठे पाऊल ठेवतो ते पाहतो. शारीरिकदृष्ट्या बोलावे तर, आम्ही पूर्वीसारखे, धडधाकड नाहीत. परंतु, प्रभु, जसे आपण पाहतो की नश्वर जीवन लुप्त होत आहे, आणि तुझ्या सहाय्या शिवाय आमची कोणतीही पाऊले निश्चित नाहीत.

199 आता देवा, आम्हांला घेऊन जाशील का? आमची अंतःकरणे आणि आमची इच्छा तुझ्या स्वत:च्या हातात घे, आणि आज रात्री, वचनासाठी, ख्रिस्तासाठी आपण बंदिवान होऊ या. आपण येथे ईश्वरी जीवन जगू द्या. हे प्रभु, ह्या स्त्रिया, ह्या तरुणी, हे तरुण, ही मुले, मुली, आपले जीवन अर्पण करोत. आणि त्यांची महत्त्वाकांक्षा ही येशू ख्रिस्ताची सेवा करण्याची महत्त्वाकांक्षा होऊ दे. आणि आपण त्याच्या दैवी कृपेचे आणि इच्छेचे बंदिवान बनू या. प्रभु, ते प्रदान कर.

200 प्रभु, हेच सर्व करणे मला माहित आहे. हे छोटे तुटलेले शब्द, आणि मी—मला विश्वास आहे की तुम्ही त्यांना योग्यरित्या, एकत्र कराल. कारण, येथे उष्णता आहे, आणि लोकांना ऐकण्याची इच्छा आहे, परंतु ते खरोखर उबदार आहे. आणि अनेकांना घरी जाऊन लवकर कामावर जायचे आहे. पण, "एक बंदिवान" ती बीजं त्यांच्या हृदयात रुजू दे.

201 घरी जाऊन बायकोला म्हणा, तसे ते...आज दुपारी किंवा आज संध्याकाळी, ते खाली उतरून प्रार्थना करण्यास तयार होतात, पलंगाच्या बाजूला, एकमेकांकडे पहा, म्हणा, "प्रिये, आज रात्री, त्या विषयी काय? काय आपण खरोखर ख्रिस्त आणि त्याच्या इच्छेचे कैदी झालो आहोत, किंवा—किंवा आपण स्वतःच्या इच्छेने काम करतो?"

202 तरुण पुरुष आणि तरुण स्त्रिया, सर्वत्र, विशेषतः ज्यांनी आज रात्री, हा संदेश ऐकला आहे, हाच प्रश्न स्वतःला विचारा, "की मी स्वतःचे जीवन सोडून, बंदिवान बनण्यास तयार आहे का?"

203 "जो आपला जीव वाचवतो तो त्याला गमावील, परंतु जो माझ्यासाठी आपला जीव गमाववील तो त्याला मिळवील." पित्या, आम्हाला माहित आहे, ते म्हणजे: तुझा बंदिवान बनावे, आपल्या स्वतःच्या महत्वाकांक्षा आणि आपल्या स्वतःच्या इच्छा गमवाव्या, तुझ्या शोधण्यासाठी, मग आपल्याला अनंतकाळचे जीवन मिळेल. प्रभु, हे प्रदान कर.

204 मला फक्त एकच गोष्ट माहित आहे, ती आता तुझ्या हातात सोपवायची आहे. आणि ती फलदायी होवो आणि शेवटच्या–दिवसाच्या कापणीसाठी महान—महान साधने निर्माण करू दे, पुरुष आणि स्त्रिया, मुले आणि मुली, देवाच्या परिपूर्ण इच्छेला समर्पित होऊ दे, आणि येशू ख्रिस्ताचे बंदिवान होऊ दे, त्याच्या प्रेमासाठी, ख्रिस्तावरील दैवी प्रेमाच्या बेड्यांनी बांधले जाऊ दे. आम्ही ते त्याच्या नावाने मागतो.

मी सर्व समर्पित करतो,

आपण उभे राहू या.

मी सर्व समर्पित करतो,
सर्व तुला, माझ्या...?...

205 डोळे मिटून आणि हात वर करून, तेच पुन्हा म्हणू या.

मी सर्व समर्पित करतो,
मी सर्व समर्पित करतो,
सर्व तुला, माझ्या धन्य उद्धार का,
मी सर्व समर्पित करतो.

206 आता, जर आपण आपली मस्तके झुकवून, आणि जाण्यापूर्वीचे गाणे गायी पर्यन्त, *टेक द नेम ऑफ जिझस विथ यू*, मी ते विचारणार आहे की—की हा भाऊ इथे आहे... मी त्याचे नाव विसरलो. ज्या बहिणीने अंधःकाराच्या दृष्टांताची साक्ष दिली, जी बरी झाली. आणि आठवलं, मागे वळून पाहिलं, तर पडदा गेला होता. तिच्या विश्वासाने ते केले. भाऊ, तू आम्हाकरिता, प्रार्थनेचा समारोप करशील? आणि आपल्यावर देवाचा आशीर्वाद माग.

***एक बंदिवान*** MAR63-0717

(A Prisoner)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, बुधवार संध्याकाळ, जुलै, 17, 1963, साली, ब्रॅन्हम टॅबरन्याकल जेफर्सनविले, इंडियाना, यू.एस.ए. येथे प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेरेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2023 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org